VIVEKANAND
S54094

प्रकरण
१

# प्रमुख राजकीय पक्ष

(Political Parties in Brief)

Data Entry

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

(Indian National Congress)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने लोकशाही शासन- प्रणालीचा अंगीकार केला. स्वातंत्र्योत्तर सहा दशकांपेक्षा अधिक काळ भारतात संसदीय लोकशाहीचा प्रयोग यशस्वीपणे चालू आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही (Largest democracy in the world) असा भारतीय लोकशाही राजवटीचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात येतो.

राजकीय पक्ष हे लोकशाही शासनव्यवस्थेचा भक्कम आधार असतात. राष्ट्रापुढील अंतर्गत व परराष्ट्रीय प्रश्नांचे निराकरण करण्याचे विविध पर्याय राजकीय पक्ष सुचवितात.

लोकांचे राजकीय शिक्षण करून जनतेत राजकीय जागृती निर्माण करणे. देशाला भेडसावणाऱ्या समस्यांबाबत लोकमत तयार करणे, समस्यांबाबत मूलभूत विचारप्रणालीचा पुरस्कार करणे आणि राष्ट्रीय हितसंवर्धनाच्या दृष्टीने निश्चित स्वरूपाचा विधायक कार्यक्रम जनतेपुढे मांडणे अशा प्रकारची कामे राजकीय पक्ष करतात.

वृत्तपत्रे, पत्रके, जाहीर सभा, मोर्चे, रेडिओ, दूरदर्शन इ. प्रसारमाध्यमांच्या मदतीने राजकीय पक्ष आपला कार्यक्रम जनतेपुढे मांडत असतात. त्यामुळे राजकीय पक्ष हे लोकशाहीचा मूलाधार ठरतात. सामान्य जनतेच्या अडीअडचणी, समस्या, तक्रारी, आशा-आकांक्षांना वाचा फोडणे व त्या शासनदरबारी पोचविण्याचे काम राजकीय पक्षांना करावे लागते. त्या अर्थाने राजकीय पक्ष हे देशातील सर्वसामान्य जनता आणि राज्यकर्ते यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. राजकीय पक्ष विविध राष्ट्रीय समस्यांबाबत आपले विचार, आपली भूमिका मतदारांपुढे मांडतात. तर निवडणुकीच्या वेळी मतदानाद्वारे मतदार त्यांच्याबाबतचा आपला कौल व्यक्त करतात.

लोकशाही शासनव्यवस्थेत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांना महत्त्वाच्या भूमिका बजावयाच्या असतात. सत्तारूढ पक्ष हा देशातील नागरिक आणि राज्यकर्ते यांच्यामधील महत्त्वाचा दुवा असतो. जनतेची गाऱ्हाणी, त्यांच्या समस्या, मागण्या



• सरकार व जनता यांच्यातील दुवा म्हणून राजकीय पक्षांना महत्व जनतेच्या समस्या सरकार दरबारी पोहचवणे

राज्यकर्त्यांच्या निदर्शनाला आणून त्यानुसार शासकीय धोरण निश्चित करण्यात सत्तारूढ पक्ष मदत करतो. त्याचप्रमाणे शासकीय धोरणे, त्यांचे स्वरूप व उद्दिष्टे यांची माहिती हा पक्ष सामान्य नागरिकांना करून देतो. पक्षाचा भक्कम पाठिंबा असल्याशिवाय शासनाला स्थैर्य लाभत नाही आणि स्थैर्याची हमी असल्याखेरीज शासनाचे काम प्रभावीपणे चालविता येत नाही.

लोकशाहीत विरोधी पक्षांचे स्थानही अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. शासनाची धोरणे जनतेच्या हिताची व राष्ट्रहिताला पोषक आहेत की नाही यावर सतत लक्ष ठेवण्याचे काम विरोधीपक्षाला करावयाचे असते. त्याचप्रमाणे सत्तारूढ पक्ष बेजबाबदारपणे वागू नये यासाठी त्याच्या धोरणातील त्रुटी, उणिवा आणि राज्यकारभारातील दोष यांचे दर्शन घडविण्यासाठी राज्यकर्त्यांना आरसा दाखविण्याचे काम विरोधी पक्षाला करावे लागते. काही प्रसंगी राज्यकर्त्यांना अंकुश लावण्याचे कामही विरोधी पक्ष करतो. दिवंगत ज्येष्ठ समाजवादी नेते व संसद सदस्य ह. वि. कामत यांनी लोकशाही व्यवस्थेतील विरोधी पक्षाच्या कामाचे अत्यंत मार्मिक शब्दांत विवेचन केले आहे. संसदीय लोकशाहीत सत्तारूढ पक्षाला विरोध करणे, त्याला उघडे पाडणे आणि पदच्युत करणे (to oppose, to expose and to depose) हे विरोधी पक्षाचे काम असते. मात्र लोकशाही कारभार सुरळीतपणे चालण्यासाठी सत्तारूढ पक्षाला केवळ विरोधासाठी विरोध न करण्याचे पथ्य विरोधी पक्षाने पाळणे अत्यंत महत्त्वाचे असते.

आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्व काळापासून बहुपक्षीय पद्धत विकसित झाल्याचे आढळते. त्यामुळेच स्वातंत्र्योत्तर कालखंडाच्या प्रारंभी देशात पक्षीय कार्यपद्धती यथास्थित प्रचलित होती. संसदीय संस्था आणि राजकीय पक्ष यांच्या विकासामुळे भारतीय संसदीय लोकशाही सुदृढ झाली. काँग्रेस, साम्यवादी पक्ष, समाजवादी पक्ष, जनसंघ तसेच किसान मजदूर प्रजा पक्ष इत्यादी पक्षांच्या कार्यपद्धतीने भारतीय लोकशाहीच्या विकासाला मोलाचा हातभार लागला. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळच्या देशातील प्रमुख राजकीय पक्षांची संरचना, संघटन कार्यक्रम आणि त्यांची धोरणे यांचा विचार केला असता बहुतेक सर्वच राजकीय पक्ष राष्ट्रीय पातळीवर काम करणारे असल्याचे लक्षात येते. त्यांची उद्दिष्टे, नेतृत्व, त्यांनी हाताळलेले प्रश्न, त्यांनी लोकांच्यापुढे मांडलेले विकासाचे कार्यक्रम देशव्यापी स्वरूपाचे होते. त्यामुळे भारतातील प्रमुख राजकीय पक्षांच्या ध्येयधोरणांचा आणि कार्यांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

### काँग्रेस–प्रभावी राजकीय पक्ष

स्वातंत्र्योत्तर कालखंडात विशेषत: नेहरू युगात काँग्रेस हाच देशातील प्रभावशाली

राजकीय पक्ष होता. सुरुवातीची तीन दशके काँग्रेस पक्ष केंद्रस्थानी आणि बहुतेक घटक राज्यांत सत्तारूढ होता. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतील नेतृत्व आणि वारसा यामुळे काँग्रेसला अफाट प्रतिष्ठा आणि वैधता प्राप्त झाली होती. काँग्रेसचा प्रभाव देशव्यापी आणि भारतीय उपखंडाला व्यापणारा होता. त्याचे संघटनात्मक जाळे संपूर्ण देशभर फैलावले होते. काँग्रेसचा सामाजिक आधार मोठमोठ्या शहरांपासून खेड्यांपर्यंत आणि बड्या भांडवलदारांपासून ते ग्रामीण परिसरातील गरिबांपर्यंत विस्तारलेला होता. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही देशातील सर्वांत महत्त्वाची राजकीय संघटना होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र काँग्रेस ही एक चळवळ न राहता तिचे राजकीय पक्षात रूपांतर झाले. काँग्रेस पक्षाने राष्ट्राला दीर्घकाळ स्थिर सरकार दिले. काँग्रेसच्या राजवटीत देशाला लाभलेल्या राजकीय स्थैर्यामुळे देशाच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळाली.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासून विसाव्या शतकाच्या समाप्तीपर्यंतच्या कालखंडात काँग्रेस पक्ष केंद्रशासनात आणि अनेक घटक राज्यांत दीर्घकाळ सत्तारूढ होता. जवाहरलाल नेहरूंच्या पुरोगामी नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने नवोदित राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे आणि अलिप्ततावादी परराष्ट्रीय धोरणाची भक्कम पायाभरणी केली. काँग्रेसच्या स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचालीचा त्यातील चढ-उतारासह या प्रकरणात आढावा घेणे आवश्यक आहे.

**स्वातंत्र्यपूर्व काँग्रेस**

स्वतंत्र भारताच्या राजकीय जीवनात दीर्घकाळ प्रभावशाली राहिलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा उगम १८८५ साली स्थापन झालेल्या हिंदी राष्ट्रीय सभा (इंडियन नॅशनल काँग्रेस) यातून झाला. सेवानिवृत्त ब्रिटिश सनदी अधिकारी ए. ओ. ह्यूम यांच्या पुढाकाराने या संघटनेची स्थापना झाली होती. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने मोलाची कामगिरी बजावली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या इतिहासात तीन प्रमुख टप्पे आढळून येतात. १८८५ ते १९०५ हा नेमस्त उदार मतवाद्यांच्या प्रभावाचा पहिला टप्पा, तर १९०५ ते १९२० हा जहाल राष्ट्रवाद्यांच्या वर्चस्वाचा दुसरा टप्पा, १९२० ते १९४७ हा तिसरा टप्पा 'म. गांधी युग' या नावाने ओळखला जातो.

• **नेमस्त :** राष्ट्रीय चळवळीच्या १८८५ ते १९०५ या पहिल्या कालखंडात प्रागतिक विचारसरणीच्या नेमस्तांचा प्रभाव होता. त्यांच्यावर पाश्चात्त्य उदारमतवादाची छाप होती. ब्रिटिशांचे हिंदुस्थानवरील राज्य ईश्वरी संकेतानुसार आले आहे, अशी त्यांची समजूत होती. नेमस्तांचा घटनात्मक मार्गांवर विश्वास होता. आपल्या मागण्या सरकारपुढे

मांडण्यासाठी प्रार्थना, अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळे, जाहीरसभा, ठराव इत्यादी मार्गांचा ते अवलंब करत. सरकारशी संघर्ष न करण्याचे त्यांचे धोरण होते. काँग्रेसमधील नेमस्त नेत्यांत **दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, नामदार गोखले, फिरोजशहा मेहता, तेलंग, दिनशॉ वाच्छा, आनंदा चार्लु, व्योमेशचंद्र बॅनर्जी, बद्रुद्दीन तय्यबजी, रासबिहारी घोष, सुब्रह्मण्यम अय्यर** इत्यादींचा समावेश होता. हिंदी जनतेत राष्ट्रीयत्वाच्या भावनेची जोपासना करण्याचे महत्त्वाचे कार्य नेमस्तांनी केले.

● **जहाल :** एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात घडलेल्या काही घटनांमुळे काँग्रेसमध्ये जहाल गट निर्माण झाला. या जहाल गटाचे प्रमुख महाराष्ट्रातील **बाळ गंगाधर टिळक,** पंजाबमधील लाला लजपतराय आणि बंगालमधील **बिपीनचंद्र पाल** हे होते. प्रार्थना, अर्ज, विनंत्या या सनदशीर मार्गावर जहाल नेत्यांचा विश्वास नव्हता. स्वराज्य दान रूपाने आम्ही सरकारकडे मागत नाही, तर तो आमचा हक्क आहे, असा त्यांचा दृष्टिकोण होता. **स्वराज्य, स्वदेशी, परदेशी मालांवर बहिष्कार** आणि **राष्ट्रीय शिक्षण** ही जहाल गटाच्या कार्यक्रमाची चतु:सुत्री होती. **'वसाहतीचे स्वराज्य'** हे काँग्रेसचे ध्येय असल्याचे १९०६ च्या कलकत्ता अधिवेशनाच्या वेळी जाहीर करण्यात आले होते. जहाल-मवाळ यांच्यातील तीव्र मतभेदामुळे १९०७ च्या सुरत अधिवेशनात काँग्रेस दुभंगली. १९१६ च्या लखनौ अधिवेशनात जहाल-मवाळगटांचे एकीकरण झाले. काँग्रेसमधील जहाल गटाने स्वदेशीची चळवळ व होमरूल लीगची चळवळ प्रभावीपणे चालवली. जहाल गटाने स्वातंत्र्य चळवळीत नवीन जोम आणला व तिला व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले.

● **गांधी युग :** १९२० साली टिळकांच्या निधनानंतर काँग्रेसचे नेतृत्व म. गांधींच्याकडे आले. त्यांच्या नेतृत्वाखाली अहिंसात्मक प्रतिकाराच्या मार्गाने सत्याग्रह चळवळ देशभर फोफावली. गांधी युगात **असहकार चळवळ, कायदेभंगाचे आंदोलन** व **छोडो भारत आंदोलन** अशी तीन मोठी आंदोलने झाली. त्या काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जनांदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले. काँग्रेस संघटना अत्यंत प्रभावी व बलवान झाली. १९२९ साली काँग्रेसने **'संपूर्ण स्वातंत्र्य'** हे आपले अंतिम ध्येय निश्चित केले. १९३१ सालच्या कराची अधिवेशनाच्या वेळी काँग्रेसने एक वीस कलमी जाहीरनामा तयार करून त्यामध्ये काँग्रेसच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक धोरणांची दिशा स्पष्ट केली. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वराज्यासाठी लढा चालवत असतानाच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नवोदित राष्ट्राची उभारणी कशी करावी याबाबत काँग्रेसने बरेच विचारमंथन केले होते.

गांधी युगात जवाहरलाल नेहरूंनी भारतीय स्वातंत्र्यलढा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील साम्राज्यवाद विरोधी व वसाहतवाद विरोधी चळवळींशी जोडून भारतीय स्वातंत्र्यलढ्याला आंतरराष्ट्रीय पटलावर वेगळी ओळख मिळवून दिली. महात्मा गांधींनी **जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, राजेंद्रप्रसाद, मौलाना आझाद, राजाजी, गफारखान, विनोबा भावे** इत्यादी नेत्यांची फळी काँग्रेसमध्ये उभी केली.

**काँग्रेसचे स्वरूप**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हे एक व्यापक व्यासपीठ होते. ब्रिटिश साम्राज्यसत्तेला विरोध करण्याच्या समान भूमिकेमुळे भिन्न वैचारिक दृष्टिकोण असणारे कार्यकर्त्यांचे अनेक गट काँग्रेसच्या नावाखाली काम करत होते. **काँग्रेस अंतर्गत साम्यवादी पक्ष, समाजवादी पक्ष, शेतकरी संघटना कार्यरत होते.** त्यामुळे काँग्रेसची कार्यपद्धती स्वातंत्र्यपूर्व काळातही लोकशाही स्वरूपाची होती.

**स्वातंत्र्योत्तर काँग्रेस**

**नेहरू पर्व** (Nehru Era) **:** स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही आपल्या देशातील सर्वांत महत्त्वाची संघटना होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र काँग्रेस ही एक चळवळ किंवा संघटना न राहता तिचे राजकीय पक्षात रूपांतर झाले. परंतु काँग्रेसच्या स्वरूपात असा बदल काही अकस्मात झाला नाही. १९४७ साली आपला देश स्वतंत्र झाल्याबरोबर काँग्रेसचे भवितव्य काय असावे याबाबत पक्षनेत्यांत मतभिन्नता निर्माण झाली. बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात पक्षाच्या घटनेत बदल करण्याचा विचार काँग्रेस कार्यकारिणी करू लागली होती. त्या वेळी **काँग्रेसचे विसर्जन करण्याचा सल्ला म. गांधींनी दिला होता.** काँग्रेसने **राजकीय पक्ष म्हणून काम न करता समाजकल्याणाचे लोकोपयोगी कार्य करणाऱ्या लोकसंघात काँग्रेसचे रूपांतर व्हावे** असे मत त्यांनी मांडले. परंतु जवाहरलाल नेहरू आणि सरदार पटेल यांना गांधीजींची ही सूचना मान्य नव्हती. नवोदित स्वतंत्र भारतापुढील कठीण समस्या सोडविणे काँग्रेसलाच शक्य होईल, देशातील जनतेने काँग्रेसच्या झेंड्याखाली स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला असल्यामुळे नवराष्ट्र निर्मितीच्या कामात जनतेचा



पंडित जवाहरलाल नेहरू

नेहरू युगात काँग्रेस पक्ष मूलत: मध्यममार्गी परंतु काहीसा डावीकडे झुकणारा होता. **लोकशाही समाजवाद या संकल्पनेत अंतर्भूत असलेल्या राष्ट्रवाद, आर्थिक विकास, सामाजिक न्याय, संपत्तीचे फेरवाट तसेच समान संधी उपलब्ध करून देणे या सर्व ध्येय उद्दिष्टांशी काँग्रेस पक्ष बांधील होता.**

## पक्षनेतृत्व – सरकार संघर्ष

पक्षनेतृत्व आणि पक्षाचे सरकार यांच्यातील संबंधांचे स्वरूप कसे असावे हें काँग्रेसला हंगामी सरकारच्या स्थापनेपासून ठरवावे लागले. सप्टेंबर १९४६ मध्ये हंगामी सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर जवाहरलाल नेहरूंनी काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पक्षाचा अध्यक्ष व सरकारचा प्रमुख या दोन भूमिका स्वतंत्र असून त्या एकाच व्यक्तीने पार पाडणे योग्य नाही असे त्यांचे मत होते. नेहरूंचे उत्तराधिकारी म्हणून आचार्य जे. बी. कृपलानी काँग्रेस अध्यक्ष झाले होते. त्यांच्या मते, पक्षाध्यक्ष व कार्यकारी समिती यांचा सरकारचे धोरण ठरवण्यात प्रत्यक्ष सहभाग असला पाहिजे आणि सर्व सरकारी निर्णय त्यांच्याशी सल्लामसलत करूनच घेतले पाहिजेत. मंत्रिमंडळही पक्षाध्यक्षाच्या सल्लामसलतीने बनविले जावे अशीही त्यांची मागणी होती. त्यांच्या या भूमिकेला जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल या दोघांनीही कसून विरोध केला. सरकारमधील अन्य काँग्रेस नेतेही कृपलानींशी सहमत नव्हते. या सर्वांचे असे मत होते की, शासकीय पातळीवरील विचार विनिमय, पत्रव्यवहार व कागदपत्रे यांची गोपनीयता राखणे आवश्यक असून त्याची वाच्यता सरकारबाहेरील कोणाकडे होऊ नये. सत्ताधारी पक्षाने स्थूलपणाने धोरणांची दिशा ठरवावी आणि त्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा सरकारने प्रयत्न करावा. मात्र प्रत्यक्ष प्रशासनाच्या कामात पक्ष पदाधिकाऱ्यांनी ढवळाढवळ करू नये. घटनात्मक दृष्टीने सरकार लोकनिर्वाचित कायदेमंडळाला जबाबदार असते, पक्षाला नव्हे. नेहरूंनी मांडलेल्या सरकारच्या भूमिकेला सरदार पटेलांनी दुजोरा दिला. पक्षाचा प्रभाव सरकारवर ठेवण्यात पक्षाध्यक्ष कृपलानींना यश आले नाही. त्यामुळे निराश झालेल्या कृपलानींनी मुदत संपण्यापूर्वीच नोव्हेंबर, १९४७ मध्ये पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर डॉ. राजेंद्रप्रसाद एक वर्ष व डॉ. पट्टाभिसीतारामय्या पुढील दोन वर्ष पक्षाध्यक्ष झाले. त्यांनी पक्षाच्या श्रेष्ठत्वाचा आग्रह धरला नाही किंवा अगदी समानतेसाठी सुद्धा हट्टाग्रह धरला नाही. त्यांनी पक्षाध्यक्षाचे कार्यक्षेत्र फक्त पक्षाच्या कामकाजापुरते मर्यादित ठेवले. परंतु त्यामुळे या प्रश्नाचा कायमचा सोक्षमोक्ष लागला नाही. नेहरू आणि पुरुषोत्तमदास टंडन यांच्यात १९५० साली पक्षावरील वर्चस्व आणि पक्ष व सरकारचे व्यवस्थापन यावरून वाद छेडला गेला.

## नेहरू-पटेल यांच्यातील ताणतणाव

जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल हे दोघे भारतीय स्वातंत्र्य-संग्रामातील सेनानी, काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते आणि हंगामी सरकारचे अध्वर्यू होते. सरदार पटेल हे काँग्रेसमधल्या उजव्या गटाचे प्रमुख नेते होते. ते कुशल संघटक व प्रशासक होते. नेहरू समाजवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते होते. त्यांना प्रचंड जनाधार आणि व्यापक सामाजिक दृष्टिकोण लाभला होता. लोकशाही आणि नागरी स्वातंत्र्याशी बांधीलकी, सर्वधर्मसमभाव, स्वावलंबी आर्थिक विकास, समाजसुधारणा, गरिबांबद्दल कणव ही राष्ट्रीय चळवळीतील मूलभूत मूल्ये नेहरूंच्याप्रमाणे पटेलांनीही अंगीकारली होती. तथापि, नेहरू आणि पटेल या दोघांच्या स्वभावात आणि वैचारिक दृष्टिकोणात मूलभूत फरक होता. १९४७ नंतर त्या दोघांतील धोरणात्मक मतभेद काही वेळा प्रकट झाले. **पंतप्रधानांचे अधिकार आणि भूमिका, १९४६-४७ मधील जातीय दंगे हाताळण्याचा दृष्टिकोण, पाकिस्तानबरोबरचे संबंध** कसे असावेत याबाबत दोघांचे विचार भिन्न होते. १९५० मध्ये पुरुषोत्तमदास टंडन यांची उजव्या गटाच्या पाठिंब्याने काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे नेहरू-पटेल यांच्यातील मतभेदांची तीव्रता वाढली. खासगी मालमत्तेच्या हक्काचा घटनेतील मूलभूत हक्कात समावेश व्हावा या सरदार पटेलांच्या भूमिकेला नेहरूंनी विरोध केला. परंतु तो विरोध अयशस्वी ठरला. धोरणात्मक प्रश्नांवरून त्या दोघांतील मतभेद विकोपास जाऊन कधी पटेलांनी तर कधी नेहरूंनी राजीनामा देण्यास निघावे, असे अनेक वेळा घडले. त्यांच्या संबंधात सतत एक प्रकारचा तणाव असे. तरीदेखील त्या दोघांनी एकत्र राहून वाटचाल केली. वास्तवात ते दोन नेते आणि त्यांचे विभिन्न विचार परस्परांना पूरक ठरले. पटेलांनी नेहरूंच्या भूमिकेला काही बाबतीत विरोध केला असला तरी त्यांनीच त्या भूमिकेला भक्कम आधारही दिला. त्यांना एकमेकांची अपरिहार्यता पटली होती. सरदार पटेल आयुष्यभर नेहरूंचे विश्वासू सहकारी म्हणून वावरले व नेहरूंच्या धोरणांना ते सतत पाठिंबा देत होते. म. गांधींच्या निधनानंतर त्यांना परस्परांच्या सहकार्याची निकड जाणवू लागली. सरदार पटेलांनी या काळात नेहरूंचा उल्लेख वारंवार 'आपले नेते' असा केल्याचे आढळते. १४ नोव्हेंबर, १९४८ या नेहरूंच्या वाढदिवशी सरदार पटेल म्हणाले होते, "पंडित नेहरूंनी गांधीजींनी आपला वारस आणि उत्तराधिकारी नेमले. गांधीजींच्या निधनानंतर त्यांचा हा निर्णय किती अचूक होता, याची आज आपल्याला कल्पना आली आहे." (Mahatma Gandhi named Pandit Nehru as his heir and successor. Since Gandhi's death we have realized that our leader's judgement was correct. Rajmohan Gandhi, Patel ; A life, p. 490) नेहरूंना

पटेलांच्या भावनेला प्रतिसाद देताना म्हणाले, ''सरदार पटेल म्हणजे सामर्थ्याचा महामेरू. त्यांच्या प्रेमाशिवाय आणि सल्ल्यांशिवाय राज्यशकट चालविणे मला शक्य झाले नसते.'' (The sardar has been a tower of strength; but for his affection and advice, I would not have been able to run the state. - Nehru, selected works, second series, Vol. 8, p. 438)

**टंडन – नेहरू संघर्ष**

ऑगस्ट, १९५० मध्ये पक्षाध्यक्षांच्या निवडणुकीच्या मुद्द्यावरून काँग्रेसमधील उजवा गट आणि नेहरू यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचला. हा संघर्ष जवळजवळ वर्षभर चालला. त्यामध्ये विचारप्रणाली आणि पक्षाची धोरणे याबाबतचे मुद्दे गुंतलेले होते. देशातील आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या संदर्भातही पक्षाध्यक्षाची निवड महत्त्वाची झाली होती. पक्षाध्यक्षपदाच्या निवडणुकीत पुरुषोत्तमदास टंडन, जे. बी. कृपलानी आणि शंकरराव देव हे तीन उमेदवार होते. सरदार पटेलांचा पाठिंबा टंडन यांना, तर नेहरूंचा पाठिंबा कृपलानींना होता. टंडन यांच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक पुराणमतवादी दृष्टिकोणामुळे नेहरूंचा त्यांना विरोध होता. या उलट, टंडन यांचे पाठीराखे त्यांना निवडून आणून नेहरूंच्यावर नियंत्रण आणू इच्छित होते. त्यांना नेहरूंच्या आर्थिक व सामाजिक तसेच परराष्ट्रीय धोरणात बदल घडवून आणण्याची गरज वाटत होती. पक्षाध्यक्षपदाच्या या अटीतटीच्या निवडणुकीत पुरुषोत्तमदास टंडन विजयी झाले. पुढे त्यांनी पक्षाच्या कार्यकारी समितीत व केंद्रीय निवडणूक समितीत आपल्या माणसांची वर्णी लावली.

१९४५ साली साम्यवादी नेते, कार्यकर्ते आणि १९४८ मध्ये समाजवादी गट काँग्रेसमधून बाहेर पडल्यामुळे काँग्रेसमधील पुरोगामी शक्ती कमजोर झाली होती. अशा वेळी पुराणमतवादी शक्तींनी काँग्रेस पक्ष व सरकारी धोरणे यावर वर्चस्व मिळविण्याचा चंग बांधला. नेहरूंनी त्याचा एकदाचा सोक्षमोक्ष लावण्याचे ठरविले. त्यांनी पक्षाच्या कामकाजात प्रत्यक्ष लक्ष घालण्याचे ठरविले. पक्षऐक्य महत्त्वाचे वाटत असूनसुद्धा पक्षावर आणि निवडणूक प्रक्रियेवर पक्षातील उजव्या गटाला ताबा बसवू देण्यास नेहरू अजिबात तयार नव्हते. आपले राजकीय चातुर्य, दृढ निर्धार आणि राजकारणातील अफाट अनुभव यांच्या जोरावर त्यांनी आपली सामाजिक-आर्थिक धोरणे व परराष्ट्रनीती यावर अखिल भारतीय काँग्रेस समितीला शिक्कामोर्तब करण्यास प्रवृत्त केले. त्यानंतर ६ ऑगस्ट, १९५१ रोजी त्यांनी पक्ष कार्यकारिणी व केंद्रीय निवडणूक समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला व टंडन आणि नेहरू यांपैकी कोणाचे विचार व दृष्टिकोण स्वीकारायचा

याचा निर्णय करण्याचे काँग्रेसजनांना आवाहन केले. या वेळी देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक नजीक येऊन ठेपली होती. नेहरूंचे प्रभावी नेतृत्व आणि त्यांचे झंझावाती प्रचार दौरे याशिवाय काँग्रेस पक्षाला निवडणूक जिंकणे शक्य होणार नाही, या जाणिवेतून काँग्रेसजनांचा कौल नेहरूंच्या बाजूने राहील हे स्पष्ट दिसू लागले. पक्षाध्यक्ष पुरुषोत्तमदास टंडन यांनी नेहरूंची राजकीय स्थिती आपल्यापेक्षा व आपल्या गटापेक्षा मजबूत असल्याचे ओळखून नेहरूंचा राजीनामा न स्वीकारता स्वत:च आपल्या पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. अखिल भारतीय काँग्रेस समितीने ८ सप्टेंबर, १९५१ रोजी टंडन यांचा राजीनामा स्वीकारला व जवाहरलाल नेहरूंची काँग्रेस अध्यक्ष म्हणून निवड केली. पंतप्रधानपद आणि पक्षाध्यक्षपद एकाच व्यक्तीकडे असण्याला नेहरूंचा तत्त्वत: विरोध होता. परंतु विशेष बाब म्हणून नेहरूंनी अ. भा. काँग्रेस समितीचा निर्णय मान्य केला. एकाच वेळी दोन्ही पदे स्वीकारल्यामुळे देशापुढील महत्त्वाच्या व तातडीच्या गंभीर समस्या हाताळणे सुकर होईल असाही त्यांचा दृष्टिकोण होता. या सर्व घडामोडीतून फारशी कटुता निर्माण झाली नाही किंवा वादंगही माजले नाही. टंडन यांनी सन्मानपूर्वक पदत्याग केला. तसेच नेहरूंनीही त्यांना कार्यकारी समितीत येण्यासाठी पाचारण केले. टंडन यांनी ते तत्काळ मान्य केले. शासनाचा गाडा सुरळीतपणे चालविण्यासाठी पक्ष आणि शासन यांच्यात सुसंवाद असणे अगत्याचे असल्याची जाणीव पक्की झाली.

**इ. स. १९४६ ते १९५१ हा काँग्रेस पक्षाच्या संसदीय राजकारणातील पहिला टप्पा** होता. हा पक्षाच्या संक्रमणाचा काळ होता. त्या काळात पक्षाची ध्येयधोरणे, कार्यपद्धती आणि पक्ष व शासन यांच्यातील संबंधाचे स्वरूप निश्चित होत होते. या कालखंडाच्या शेवटी काँग्रेसमध्ये नेहरूंचे एकमुखी नेतृत्व प्रस्थापित झाले. पक्ष आणि शासन यामध्ये त्यांचा शब्द अखेरचा होता आणि १९६४ मध्ये निधन होईपर्यंत त्यांचे हे स्थान अबाधित होते. **१९५१ ते १९६२ हा काँग्रेसच्या राजकारणातील दुसरा टप्पा होता.** या काळात पक्ष आणि शासन यांच्यात तणाव अगर संघर्ष झाला नाही. त्याचे कारण असे होते की, त्या काळात कधी पक्ष व शासन यांच्या सत्तेचे एकत्रीकरण झाले तर कधी पक्षाने धोरण निश्चित करण्यातील शासनाचे अग्रस्थान मान्य केले. १९५१ च्या सप्टेंबरमध्ये नेहरूंची पक्षाध्यक्षपदी निवड झाली. तेव्हापासून १९६२ पर्यंत पक्ष आणि शासन यांच्यात अधूनमधून मतभेद झाले. परंतु संबंधात तणाव राहिला नाही. पक्ष आणि सरकार यांच्यातील सामंजस्य बहुधा कायम टिकले. नेहरू १९५३ नंतर पुन्हा कधीच काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष झाले नाहीत. तरी त्यांच्या उर्वरित हयातीत पक्ष व सरकार यांच्यात कधी संघर्ष झाला नाही. या काळात काँग्रेस कार्यकारिणी ही पक्ष व सरकार यातील आणि राज्य सरकारे

आणि केंद्र सरकार यातील दुवा बनली. या कालखंडात काही अपवाद वगळता नेहरूंच्या धोरणांचा काँग्रेसने पुरस्कार केला.

**समाजवादी समाजरचनेकडे वाटचाल**

१९४८ साली समाजवादी गट काँग्रेसमधून बाहेर पडल्यामुळे काँग्रेसमधील पुरोगामी शक्ती दुर्बल झाल्या होत्या. त्यांच्या जागी जमीनदार, श्रीमंत शेतकरी आणि संस्थानिक यांचा भरणा झाला होता. काँग्रेस पक्ष वैचारिकदृष्ट्या कमकुवत झाल्याचे नेहरूंना जाणवू लागले होते. त्यामुळेच नेहरूंनी समाजवाद्यांना काँग्रेसमध्ये परत आणण्याचे किंवा सरकारचे विकास कार्यक्रम आणि समतावादी कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीत तरी त्यांचे सहकार्य लाभावे यासाठी अनेक वेळा प्रयत्न केले. समाजवादी नेत्यांबद्दल विशेषत: जयप्रकाश नारायण यांचेबद्दल त्यांना नितांत आदर व प्रेम वाटत असे. समाजवाद्यांना काँग्रेसमध्ये परत आणण्याचा १९४८ मध्येच नेहरूंनी पहिला प्रयत्न केला होता. परंतु समाजवादी मंडळींकडून त्याला अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. १९५१ मध्ये समाजवाद्यांबरोबरचे संबंध सुधारण्याचा नेहरूंनी एक प्रयत्न केला, परंतु तोही झिडकारण्यात आला. १९५२ मधील सार्वत्रिक निवडणुकीमधील विजयानंतर समाजवाद्यांबरोबर एकोप्याने काम करण्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रयत्न नेहरूंनी केला. १९५७ मध्ये नेहरूंनी काँग्रेसशी सहकार्य करण्याचे समाजवाद्यांना आवाहन केले. जयप्रकाश यांचा त्या आवाहनालाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही.

समाजवाद्यांचे सहकार्य मिळविण्याचे कामी अनेक वेळा प्रयत्न करूनही नेहरूंना यश लाभले नाही. त्यामुळे आपल्या समाजवादी कार्यक्रमांची अंमलबजावणी समाजवाद्यांच्या सहकार्याशिवाय काँग्रेस पक्षातील डाव्या विचारसरणीच्या लोकांची मदत घेऊन करावी लागणार हे नेहरूंच्या लक्षात आले. काँग्रेसची पुनर्बांधणी करून समाजवादी समाजरचनेसाठी नेहरूंनी स्वत: कृती करण्याचे ठरविले. त्यासाठी आर्थिक विकास व सामाजिक समता, न्याय या संदर्भात पक्षाच्या धोरणात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यानुसार १९५३ मध्ये त्यांनी जमीनसुधारणा धोरणाची व्याप्ती वाढवली. जमीनदारी निर्मूलनापासून कमाल जमीनधारणा कायद्यापर्यंत अनेक सुधारणा त्या धोरणात अंतर्भूत करण्यात आल्या होत्या. **जानेवारी, १९५५ च्या आवडी (तमिळनाडू)** येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात समाजवादी समाजरचना प्रस्थापित करणे हे नियोजनाचे अंतिम उद्दिष्ट असावे आणि अशा व्यवस्थेत उत्पादनाची प्रमुख साधने सामाजिक मालकीची अथवा सामाजिक नियंत्रणाखाली असावीत, उत्पादनवाढीला चालना दिली जावी आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे न्याय्य वाटप होण्याची व्यवस्था असावी, अशा आशयाचा नेहरूंनी मांडलेला ठराव पास झाला. दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक

योजनेत समाजवादी समाजरचनेच्या तत्त्वाला असलेली बांधीलकी घट्ट करण्यासाठी तरतूद होती. समाजवादी व्यवस्थेच्या उभारणीत आर्थिक आशयावर विशेष भर असावा आणि नियोजनाच्या माध्यमातून हे उद्दिष्ट साध्य केले जावे असा ठराव **१९५६ च्या अमृतसर अधिवेशनात** मंजूर करण्यात आला. कार्यक्रमाच्या दृष्टीने काँग्रेस आणखी डावीकडे झुकली ती नागपूर अधिवेशनानंतर. **जानेवारी, १९५९ मध्ये झालेल्या नागपूर अधिवेशनात** सहकारी तत्त्वावर सामूहिक शेतीला प्रोत्साहन देण्याचा ठराव पास करण्यात आला. कृषिक्षेत्रातील दलालांना दूर करण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात शेती सहकारी संस्था स्थापन व्हाव्या आणि जमिनीच्या मालकीची कमाल मर्यादा घालून देण्यात यावी, असे महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. नागपूर अधिवेशनातील निर्णयांना पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरूनही प्रखर विरोध होऊ लागला. त्यामुळे नागपूर येथील निर्णय गुपचूप गुंडाळून ठेवले. कमाल जमीनधारणा कायदा वगळता नागपूर ठरावातील अन्य बाबी लवकरच सोडून देण्यात आल्या. **१९६४ च्या भुवनेश्वर अधिवेशनात** पुन्हा एकदा **काँग्रेसने लोकशाही समाजवादावरील निष्ठेचा पुनरुच्चार** केला आणि संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून शांततेच्या व न्याय्यमार्गाने ही उद्दिष्टे गाठण्याचा निर्धार एका ठरावाद्वारे भुवनेश्वर अधिवेशनांत व्यक्त करण्यात आला. काँग्रेसच्या विविध अधिवेशनात मंजूर करण्यात आलेल्या ठरावावरून समाजवादाच्या उद्दिष्टाप्रत जाण्याचे पुरोगामी मार्ग काँग्रेस पक्षाच्या विचाराधीन होते, असे आढळून येते. नेहरूंनी काँग्रेस पक्षाला मध्यापासून डावीकडे झुकणाऱ्या मार्गावर ठेवण्याचे सतत प्रयत्न केले.

**काँग्रेसची अधोगती**

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसचा जनतेशी असलेला संपर्क हळूहळू कमी होत गेला. एक पक्ष म्हणून काँग्रेसच्या गुणवत्तेला उतरती कळा लागली. एका राजकीय विश्लेषकाने म्हटल्याप्रमाणे काँग्रेस पक्षात वाढता भ्रष्टाचार, भ्रमनिरास आणि उत्साहाचा अभाव दिसू लागला. पक्षाच्या नेतेमंडळींनी स्वतःची प्रतिमा उभी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे काँग्रेसच्या कामकाजात राजकीय दलाल, मध्यस्थ आणि मतपेढ्या उदयाला येऊन प्रभावी ठरू लागल्या. पक्षात गटबाजी आणि कटकारस्थाने यांना ऊत आला. परिणामतः पक्षाच्या कनिष्ठ स्तरावरील कामात लोकशाही तत्त्वांना तिलांजली दिली गेली. पक्ष कार्यकर्त्यांचा योग्य मान राखला गेला नाही. उलट, पक्षकार्यकर्त्यांचे अवमूल्यन केले गेले. अशा बाबींमुळे पक्षाची जनमानसातील प्रतिमा डागाळू लागली. काँग्रेस म्हणजे सत्तेसाठी भांडणाऱ्या नेत्यांच्या पक्ष आहे, अशी प्रतिमा जनमानसात निर्माण होऊ लागली. समाजवादाशी बांधीलकी असल्याचे वारंवार स्पष्ट करूनदेखील काँग्रेसची अधोगती रोखता आली नाही. काँग्रेसवर देशभर कठोर टीका होत होती. काँग्रेसबद्दलचा जनतेचा

भ्रमनिरासही वाढत गेला. काँग्रेस पक्ष संघटना कमकुवत होत गेली आणि पक्षातील अंतर्गत दुफळी गंभीर बनत चालली. प्रशासकीय भ्रष्टाचार सहन न होण्यापलीकडे वाढत चालला होता. काँग्रेस लोकांपासून दुरावत चालली होती आणि त्याच वेळी विविध राज्यांमध्ये विरोधकांची शक्ती हळूहळू वाढत होती. १९६३ साली लोकसभेच्या तीन ठिकाणच्या पोटनिवडणुकीत पक्षाचा बालेकिल्ला असणाऱ्या मतदारसंघात काँग्रेस पराभूत झाली. त्यातून काँग्रेस पक्षाची दुर्बलता स्पष्ट झाली. त्यामुळे नेहरूंनंतर कोण? अथवा नेहरूंनंतर काय? अशा प्रश्नांची लोक चर्चा करू लागले.

**कामराज योजना**

१९६० सालापर्यंत पक्षाचे महत्त्व कमी होणे योग्य नाही याची नेहरूंना जाणीव झाली. तशात १९६२ साली चिनी आक्रमण रोखण्यात सरकारला आलेले अपयश व त्या वेळी देशातील निरनिराळ्या गटांनी केलेली प्रखर टीका, नेहरू सरकारविरुद्ध विरोधी पक्षांनी ऑगस्ट, १९६३ मध्ये मांडलेला अविश्वासाचा ठराव, काँग्रेस शासनातील भ्रष्टाचार व अकार्यक्षमता, महागाईमुळे वाढलेला जनतेतील असंतोष व मे, १९६३ च्या पोटनिवडणुकीतील काँग्रेस उमेदवारांचा दारुण पराभव इत्यादींमुळे काँग्रेसच्या पायाखालची जमीन हादरू लागली. काँग्रेसच्या डागाळलेल्या प्रतिमेला उजाळा देण्यासाठी उपाय-योजनांचा विचार पक्षश्रेष्ठी करू लागले. पक्षामध्ये नवचैतन्य आणण्याचा आणि पक्ष व सरकार यांच्यात समतोल साधण्याचा प्रयत्न नेहरूंनी मद्रासचे तत्कालीन मुख्यमंत्री के. कामराज यांच्या मदतीने केला. जनमानसातील काँग्रेसच्या प्रतिमेला उजाळा देण्याच्या विचारातून **'कामराज योजना'** तयार झाली. काँग्रेस कार्यकारी समितीच्या ऑगस्ट, १९६३ मधील एका बैठकीत कामराज योजनेला मान्यता देण्यात आली. या योजनेचा आशय असा होता की, केंद्र सरकारमध्ये मंत्री असलेल्या व राज्यांच्या मुख्यमंत्रिपदी असलेल्या अनेक ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांनी स्वखुशीने आपापल्या पदांचे राजीनामे द्यावे व पक्ष संघटनेच्या कार्याला वाहून घ्यावे. पक्षकार्याला वाहून घेण्यासाठी ज्येष्ठ पक्षनेत्यांनी मंत्रिपदाचे आपले राजीनामे पंतप्रधान नेहरूंना सादर करावे आणि कोणाचे राजीनामे मान्य करावयाचे ते नेहरूंनी ठरवावे. या योजनेला पक्षाच्या महासमितीने मान्यता दिली. कामराज योजनेमुळे काँग्रेस पक्षाला नवचैतन्य प्राप्त होईल, अशी अपेक्षा होती. त्याचप्रमाणे पक्षात वरच्या पातळीवर शुचिता आणणे नेहरूंना शक्य होणार होते. कामराज योजनेचे पक्षाच्या सर्वच स्तरांवरून उत्साहाने स्वागत करण्यात आले. मंत्रिपदावरील जवळजवळ ३०० जणांनी तत्काळ पदाचे राजीनामे सादर केले. त्यात केंद्रीय मंत्रिमंडळातील सर्व मंत्री व सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचा समावेश होता. २४ ऑगस्ट, १९६३ रोजी सहा ज्येष्ठ

मंत्र्यांचे तसेच राज्यांच्या सहा मुख्यमंत्र्यांचे राजीनामे स्वीकारल्याचे नेहरूंनी जाहीर केले. त्यामध्ये मोरारजी देसाई, लालबहादूर शास्त्री, स. का. पाटील, जगजीवनराम, बी. गोपाल रेड्डी आणि के. एल. श्रीमाळी यांचा समावेश होता. कामराज योजना लागू करण्यास तसा फार उशीर झाला होता. सदर योजना लागू केल्यानंतरची कार्यवाही पूर्ण करण्याइतपत आजारपणामुळे नेहरूंच्यात शक्ती राहिली नव्हती. सरकारी जबाबदारीतून मुक्त झालेल्या नेत्यांच्याकडे दुसरे कोणतेही काम सोपवले गेले नाही. फक्त के. कामराज यांच्याकडे जानेवारी, १९६४ मध्ये काँग्रेसच्या पक्षाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. पक्षशुद्धी करण्याचा कामराज योजनेचा मूळ हेतू फारसा सफल झाला नाही. या योजनेचा एक अप्रत्यक्ष परिणाम मोरारजी देसाईंचे पक्षातील स्थान कमजोर होण्यात झाला. कामराज योजनेमुळे काँग्रेस पक्षाच्या राज्यशाखांच्या प्रभावशाली नेत्यांचे केंद्रीय राजकारणात महत्त्व व सामर्थ्य वाढले. २७ मे, १९६४ रोजी जवाहरलाल नेहरूंचे जेव्हा निधन झाले त्या वेळीही काँग्रेस पक्षाची अधोगती थांबलेली नव्हती.

## आधुनिक भारताचे शिल्पकार

जवाहरलाल नेहरू भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील एक महान सेनानी होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तेच भारताचे पहिले पंतप्रधान झाले. मोठ्या कष्टाने मिळविलेल्या देशाच्या स्वातंत्र्याचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडली. नेहरूंना भारतीय जनता, भारतीय इतिहास, परंपरा, संस्कृती याबद्दल फार मोठा जिव्हाळा वाटे. ऑगस्ट, १९४७ पासून मे, १९६४ मध्ये त्यांचे निधन होईपर्यंत देशाचे राजकारण, अर्थकारण, समाजकारण व परराष्ट्रधोरण यावर पं. नेहरूंच्या विचारांची छाप होती. त्यामुळे तो कालखंड भारताच्या इतिहासातील 'नेहरू युग' या नावाने ओळखला जातो. देशाच्या राष्ट्रीय व राजकीय जीवनात नेहरूंनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. आधुनिक भारताचे एक शिल्पकार असा त्यांचा उल्लेख करणे उचित आहे. त्यांचे लोकशाहीवादी, समाजवादी, मानवतावादी आणि द्रष्टा नेता असेही वर्णन केले जाते. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून नेहरूंना उरात धडकी भरवणाऱ्या समस्यांना सामोरे जावे लागले. नवोदित राष्ट्राची प्रगती साधण्यासाठी त्यांनी आर्थिकनियोजन, धर्मनिरपेक्षतेचे धोरण आणि अलिप्ततावादी परराष्ट्रधोरण यांचा अवलंब केला.

**आर्थिक नियोजन :** ब्रिटिश राजवटीच्या काळात भारताचे अपरिमित आर्थिक शोषण करण्यात आले होते. देशाची आर्थिक परिस्थिती भयावह झाली होती. भारतासारख्या अविकसित देशाची आर्थिक प्रगती घडवून आणण्यासाठी सर्वव्यापी नियोजनाची आवश्यकता असल्याची जाणीव नेहरूंना स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच झाली होती. त्यामुळेच

काँग्रेसने १९३८ साली नेहरूंच्या अध्यक्षतेखाली नियोजन समिती स्थापन केली होती. देश स्वतंत्र झाल्यानंतर पंतप्रधान या नात्याने त्यांनी प्रथम नियोजन सल्लागार मंडळ व नंतर नियोजन मंडळाची स्थापना करून भारताच्या नियोजनबद्ध आर्थिक विकासाला चालना दिली. देशातील नियोजनाच्या स्वरूपाबद्दलच्या त्यांच्या कल्पना प्रामाणिक व सुस्पष्ट होत्या. भारताच्या अर्थव्यवस्थेला नियोजनाचा आधार देण्यावर त्यांचा भर होता. नेहरूंच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकालात देशाच्या तीन पंचवार्षिक योजना तयार करण्यात आल्या आणि त्यापैकी पहिल्या दोन यशस्वीपणे राबवण्यात येऊन तिसऱ्या योजनेची अंमलबजावणी सुरू होती. अवजड व मूलभूत उद्योगांची स्थापना सार्वजनिक क्षेत्रात करून भारताच्या नियोजित आर्थिक विकासाचा भरभक्कम पाया नेहरूंनी घालून ठेवला. सार्वजनिक क्षेत्रात मूलभूत उद्योग सुरू केले असले तरी त्याचबरोबर औद्योगिक उत्पादनात खंड पडू नये म्हणून खासगी उद्योजकांच्या कर्तृत्वाला मोकळे क्षेत्र लाभावे या हेतूने त्यांनी भारतात संमिश्र अर्थव्यवस्थेचा पाया घातला. त्यांच्याच कारकिर्दीत भिलई, भाक्रानानगल यासारखी मोठमोठी 'उद्योग, जलसिंचन, विद्युतनिर्मिती केंद्रे' उभारली गेली. विकासाची ती केंद्रे म्हणजे नवभारताची तीर्थक्षेत्रे आहेत असे नेहरू म्हणत. शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य या बाबतीत देश परावलंबी राहू नये या दृष्टीने शस्त्रास्त्र निर्मितीलाही याच काळात प्रारंभ झाला. आर्थिक नियोजनाच्या मार्गाने पंचवार्षिक योजनांच्या अंमलबजावणी काळात भारताची औद्योगिक क्षेत्रात स्वावलंबन व विकास या दिशेने लक्षणीय प्रगती झाली.

**धर्मनिरपेक्षता :** आपल्या खंडप्राय देशात विविध जाती, धर्म, पंथ यांचे अनुयायी असणारे लोक शतकानुशतके गुण्यागोविंदाने एकत्र राहतात, हे वास्तव लक्षात घेऊन भारताच्या राज्यघटनेत धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा समावेश केला आहे. राज्यघटनेने भारत हे धर्मातीत राज्य (Secular state) निर्माण केले आहे. धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वानुसार कोणत्याही एका विशिष्ट धर्माला राजाश्रय देण्यात आलेला नाही. मात्र प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या धर्माप्रमाणे आचरण ठेवण्याचा व उपासना करण्याचा अधिकार आहे. कोणाही व्यक्तीला त्याच्या धर्मामुळे दुजाभावाची वागणूक दिली जात नाही. जवाहरलाल नेहरूंनी आपल्या राज्यकारभारात, शासनव्यवहारात धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा नेहमी आदर केला. या तत्त्वाचे नेहरूंनी सतत कटाक्षाने पालन केले. धर्मनिरपेक्षतेच्या नेहरूंनी केलेल्या अंमलबजावणीमुळे देशातील राष्ट्रीय एकात्मकतेची भावना वाढीला लागली.

**अलिप्ततावादी परराष्ट्र धोरण :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडात भारताच्या परराष्ट्र धोरणावर पंडित नेहरूंच्या विचारांचा जबरदस्त प्रभाव पडला होता. भारत स्वतंत्र झाला तेव्हा जागतिक राजकारणात अमेरिका व सोव्हिएत रशिया या दोन महासत्तांच्या

नेतृत्वाखाली जगातील राष्ट्रांचे दोन लष्करी सत्तागटात विभाजन झाले होते. जागतिक राजकारणात शीतयुद्ध सुरू झाले होते. या पार्श्वभूमीवर नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारताचे परराष्ट्र धोरण नेहरूंना आखावयाचे होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपला विकास साधण्यासाठी भारताला शांतता व राजकीय स्थैर्य यांची नितांत आवश्यकता होती. त्यामुळे भारताने अमेरिका किंवा रशिया यापैकी कोणत्याही गटात प्रवेश केला नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततावादी धोरणाचा नेहरूंनी स्वीकार केला. त्याचबरोबर त्यांनी जागतिक शांततेचाही पुरस्कार केला. भारताने स्वीकारलेल्या तटस्थतेच्या व अलिप्ततेच्या धोरणामुळे भारताला आंतरराष्ट्रीयक्षेत्रात प्रतिष्ठा प्राप्त झाली. तटस्थ राष्ट्र म्हणून भारताला जागतिक राजकारणातील अनेक पेचप्रसंगांत मध्यस्थी करण्याची संधी मिळाली. भारताने अमेरिका व रशिया या दोन सत्तागटांपासून अलिप्त राहून दोन्ही महासत्तांशी सलोख्याचे संबंध राखले. जागतिक राजकारणात नेहरूंनी आपल्या अलिप्ततावादी धोरणामुळे अनेक वेळा **जागतिक शांतिदूताची** भूमिका यशस्वीरित्या पार पाडली.

**विज्ञान व संशोधन :** भारतात विज्ञान व संशोधन क्षेत्रात झपाट्याने प्रगती व्हावी यासाठी नेहरूंनी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीकरिता विज्ञानाचा वापर व्हावा, यावर त्यांचा फार भर होता. वैज्ञानिक संशोधनाचे महत्त्व ओळखून संशोधन कार्यासाठी सरकारकडून सढळ हाताने निधी दिला जाऊ लागला. विज्ञानाच्या सर्वच शाखांत संशोधन कार्य चालविण्याकरिता नेहरूंच्या प्रोत्साहनाने देशभर विज्ञान संस्थांचे जाळे निर्माण झाले. अनेक राष्ट्रीय प्रयोगशाळा स्थापन झाल्या. त्यांच्याच पाठिंब्याने 'अ‍ॅटॉमिक एनर्जी कमिशन'ची व मुंबई येथे होमी भाभा यांच्या मार्गदर्शनाखाली 'अ‍ॅटॉमिक रिअ‍ॅक्टर केंद्रा'ची स्थापना झाली.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान या नात्याने जवाहरलाल नेहरूंनी मोठ्या दूरदृष्टीने देशाच्या विविध क्षेत्रांतील धोरणांची आखणी केली. भारताच्या सर्वांगीण प्रगतीची त्यांच्या कारकिर्दीत भक्कम पायाभरणी झाली. नेहरूंच्या कामगिरीचे मूल्यमापन कोणत्याही ऐतिहासिक मापदंडाने केले तरी त्यांचे कर्तृत्व अफाट होते असे आढळते.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : खाली दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. काँग्रेसमधील समाजवादी गट .... मध्ये पक्षातून फुटून निघाला.

(अ) १९४६ (ब) १९४७ (क) १९४८ (ड) १९५०

२. ऑगस्ट, १९५० मधील काँग्रेस अध्यक्षाच्या निवडणुकीत सरदार पटेलांचा पाठिंबा ....... यांना होता.

*(अ) शंकरराव देव* *(ब) मोरारजी देसाई*

*(क) पुरुषोत्तमदास टंडन* *(ड) जे. बी. कृपलानी*

३. जानेवारी, १९५५ मध्ये काँग्रेसचे अधिवेशन ..... राज्यात आवडी येथे भरले होते.

*(अ) ओरिसा (ब) आंध्र (क) बंगाल (ड) तमिळनाडू*

४. के. कामराज यांची ..... मध्ये काँग्रेस अध्यक्षपदी निवड झाली.

*(अ) १९६० (ब) १९६२ (क) १९६३ (ड) १९६४*

५. कामराज योजनेच्या अंमलबजावणीमुळे .... यांचे काँग्रेस पक्षातील स्थान कमजोर झाले.

*(अ) मोरारजी देसाई* *(ब) जगजीवनराम*

*(क) स. का. पाटील* *(ड) बिजू पटनाईक*

**प्रश्न २ : टीपा लिहा.**

(अ) नेमस्तांचे कार्य (ब) नेहरू-पटेल संबंध

(क) टंडन-नेहरू संघर्ष (ड) कामराज योजना

(इ) आर्थिक योजना (ई) अलिप्ततावादी धोरण.

**प्रश्न ३ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. काँग्रेसचे पक्षनेतृत्व व सरकार यांच्यातील संघर्षाची चर्चा करा.

२. समाजवादी समाजरचनेच्या निर्मितीसाठी काँग्रेसने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांचा आढावा घ्या.

३. आधुनिक भारताच्या जडणघडणीतील जवाहरलाल नेहरूंच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

❇❇❇

प्रकरण २

# इंदिरा गांधी : पर्व

## (Indira Gandhi : Influential Era)

मे, १९६४ मध्ये जवाहरलाल नेहरू कालवश झाल्यानंतर भारतीय राजकीय व्यवस्थेच्या सामर्थ्याची कसोटी लागली. देशातील व परदेशातील अनेक राजकीय विश्लेषकांनी वारसाच्या प्रश्नावरून काँग्रेस पक्षात तंटे आणि मतभेद निर्माण होऊन कदाचित तो पक्ष मोडून पडेल, असे भाकीत केले होते. नेहरूंच्या निधनानंतर त्यांच्या उंचीचा व अखिल भारतीय मान्यता असलेला नेता काँग्रेस पक्षात न उरल्याने विविध राज्यांतील काँग्रेस पुढाऱ्यांचा पक्षाच्या राजकारणात प्रभाव वाढू लागला. तसेच काँग्रेसमधील काही नेत्यांच्या तोपर्यंत दबलेल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आता बळावू लागल्या. त्यातून पक्षांतर्गत मतभेद वाढण्याची लक्षणे दिसू लागली. त्या वेळी काँग्रेस अध्यक्ष के. कामराज यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. नेहरूंची जागा सहज भरून निघण्यासारखी नसल्यामुळे भविष्यात काँग्रेसला सामुदायिक नेतृत्व व सामूहिक जबाबदारीची भूमिका स्वीकारावी लागेल, असे त्यांनी ठाम प्रतिपादन केले. काँग्रेस नेत्यांनी समन्वयाची भूमिका घेऊन लालबहादूर शास्त्री यांची नेहरूंचे उत्तराधिकारी म्हणून एकमुखाने निवड केली. अशा प्रकारे नेहरूंच्या वारसदाराची निवड विनाअडथळा, सामंजस्याने पार पडली.

नवनिर्वाचित पंतप्रधान लालबहादूर शास्त्री सौम्य प्रकृतीचे, धोरणी, मनमिळाऊ आणि प्रामाणिक असल्यामुळे त्यांना काँग्रेस पक्षात आदराचे स्थान लाभले होते. पंतप्रधान पदावर फक्त एकोणीस महिने काम केलेल्या शास्त्रीजींचे तेव्हाच्या रशियात ताश्कंद येथे १० जानेवारी, १९६६ रोजी हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन निधन झाले. शास्त्रीजींच्या आकस्मिक मृत्यूमुळे भारताच्या पंतप्रधानाच्या वारसाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. दोन वर्षांत दुसऱ्यांदा विनाअडथळा सत्तांतर झाले आणि भारतीय राजकीय व्यवस्थेच्या क्षमतेवर शिक्कामोर्तब झाले.

शास्त्रींच्या निधनानंतर पंतप्रधान पदासाठी काँग्रेस अध्यक्ष के. कामराज आणि पक्षांतर्गत सिंडिकेट या गटाने श्रीमती इंदिरा गांधी यांची निवड केली. १९६३ साली काँग्रेस अंतर्गत सिंडिकेट गटाची स्थापना झाली होती. त्यामध्ये मद्रासचे के. कामराज, बंगालचे अतुल्य घोष, मुंबईचे स. का. पाटील, आंध्र प्रदेशचे नीलम संजीव रेड्डी,

विश्वास आणि सहकार्य काँग्रेसच मिळवू शकेल, अशी त्यांची धारणा होती. त्यानुसार काँग्रेसने राजकीय पक्ष म्हणून कार्य करावे असा निर्णय अखेर घेण्यात आला.

१८८५ साली स्थापन झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या राष्ट्रीय व्यासपीठाचे १९४८ साली काँग्रेस पक्षात रूपांतर झाले. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशातील शासनाची सूत्रे काँग्रेसच्या हाती होती. मात्र एक सुसंघटित राजकीय पक्ष बनण्यासाठी काँग्रेसला संघटनात्मक एकजिनसीपणा असण्याची गरज होती. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुढाकाराने ती पूर्ण झाली. १९४८ साली काँग्रेसच्या जयपूर अधिवेशनात काँग्रेसची नवी घटना मंजूर करण्यात आली. त्यानुसार काँग्रेस पक्ष सदस्यांनी पक्षाच्या अंगीकृत धोरणांचाच पुरस्कार करावा; इतर कोणत्याही पक्षाचे अथवा गटाचे सदस्यत्व पत्करू नये अशा अटी घालण्यात आल्या. तसेच स्वत:ची घटना व संघटना असणाऱ्या कोणत्याही पक्षाच्या वा गटाच्या सभासदांना काँग्रेसचे सदस्यत्व देण्यात येऊ नये अशी तरतूद काँग्रेस पक्षाच्या घटनेत करण्यात आली. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस समाजवादी व साम्यवादी पक्षांचे सभासद आपली पक्ष संघटना बांधत असतानाच काँग्रेसचे सभासद होऊ शकत होते. काँग्रेस पक्षाच्या घटनाबदलामुळे भिन्न विचारांच्या गटांना सामावून घेणारी संघटना हे काँग्रेसचे पूर्वीचे सर्वसमावेशक स्वरूप राहणार नाही, हे स्पष्ट झाले. त्यामुळे काँग्रेसच्या बदलत्या स्वरूपाबाबत काँग्रेसमधील समाजवाद्यांचा गैरसमज झाला. संभाव्य धोरणात्मक मतभेदामुळे जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया यांच्यासारख्या समाजवाद्यांनी १९४८ साली काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सर्वसमावेशक स्वरूप असलेल्या काँग्रेसला मोठा धक्का बसला. समाजवाद्यांच्या काँग्रेस सोडण्याचे काँग्रेसच्या समाजवादी आकांक्षांवर विपरीत परिणाम होऊ शकतात हे ओळखून समाजवाद्यांना काँग्रेस पक्षात परत आणण्याचे किंवा राष्ट्र उभारणीच्या कार्यात त्यांचे सहकार्य मिळविण्याचे नेहरूंनी अनेक वेळा प्रयत्न केले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस हा एक वेगळा राजकीय पक्ष बनला. त्याची कार्यप्रणाली आणि निर्णयप्रक्रिया लोकशाही प्रकारची होती. त्यात मतभेदांना वाव होता. अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर पक्षांतर्गत चर्चा होत असे. पक्ष-सभासदांची मते किंवा दृष्टिकोण पक्षाच्या वार्षिक अधिवेशनात व अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीत व्यक्त होत असत. पक्षाच्या संघटनेचे जिल्हा व प्रांतिक घटक परिणामकारकरित्या काम करत आणि कार्यकर्त्यांचे विविध दृष्टिकोण, त्याची मते पक्षनेतृत्वाच्या निदर्शनाला आणून देत. स्वत: जवाहरलाल नेहरू पक्षात लोकशाही पद्धतीने काम करत. त्यामुळे काँग्रेस पक्षांतर्गत लोकशाही प्रक्रिया रूढ झाली.

कर्नाटकचे एस. निजलिंगाप्पा या प्रादेशिक नेत्यांचा समावेश होता. सिंडिकेट गटाला मोरारजी देसाईंचा पराभव करू शकणाऱ्या पण त्यांच्या (सिंडिकेटच्या) छायेखाली राहणाऱ्या उमेदवाराची गरज होती. त्यासाठी त्यांनी इंदिरा गांधींचे नाव पुढे केले.

### पंतप्रधानपदी इंदिरा गांधींची निवड

इंदिरा गांधी जवाहरलाल नेहरूंची मुलगी असून त्यांना संपूर्ण देशाला आकर्षण वाटावे अशी प्रागतिक प्रतिमा लाभली होती. त्यांची ओळख एखादे राज्य, प्रदेश, जात किंवा धर्म यांच्याशी निगडित नव्हती. इंदिरा गांधी तरुण, अननुभवी स्त्री असून काँग्रेस पक्षात त्यांना भरीव आधार नसल्यामुळे त्या सर्वांशी जुळवून घेतील, असे सिंडिकेटच्या नेत्यांना वाटले. परंतु काँग्रेस पक्षातील बहुमत इंदिरा गांधी यांना पंतप्रधान पद देण्यास अनुकूल असल्याचे मोरारजी देसाईंना मांन्य नव्हेते. त्यामुळे पंतप्रधान पदासाठी लढा देण्यास ते पुढे सरसावले. पक्षातील परंपरावादी उजव्या गटाचा त्यांना पाठिंबा होता. तडजोडीचे प्रयत्न फोल ठरल्यामुळे नेता निवडीसाठी निवडणूक अटळ झाली. मोरारजी देसाई हे पक्षात ज्येष्ठ व अधिक अनुभवी, तसेच उत्तम प्रशासक आणि अत्यंत प्रामाणिक होते. परंतु त्यांचा स्वभाव ताठर होता आणि ते हेकेखोर होते. ते उजव्या विचारसरणीचे असल्याचा त्यांचा लौकिक होता. पक्षाध्यक्ष कामराज यांनी इंदिरा गांधींच्या प्रचार आघाडीची सूत्रे सांभाळली. देशातील सौदापैकी बारा मुख्यमंत्र्यांनी इंदिरा गांधींना पाठिंबा जाहीर केला. काँग्रेस संसदीय पक्षात १९ जानेवारी, १९६६ रोजी पक्षनेता निवडीसाठी गुप्त मतदान घेण्यात आले. त्या निवडणुकीत इंदिरा गांधींनी ३५५ विरुद्ध १६९ मतांनी मोरारजी देसाईंचा पराभव केला. इंदिरा गांधी देशाच्या तिसऱ्या पंतप्रधान झाल्या. २४ जानेवारी, १९६६ रोजी इंदिरा गांधींचा देशाच्या तिसऱ्या पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला. त्यांची पंतप्रधान पदावरील १५ वर्षांची कारकीर्द जितकी संघर्षमय तितकीच देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने लक्षणीय ठरली.

**इंदिरा गांधींचे व्यक्तिमत्त्व :** इंदिरा गांधी (१९१७-१९८४) या भारताच्या एक अत्यंत सक्षम व कर्तृत्ववान पंतप्रधान होत्या. देशाच्या राजकीय पटलावरील त्यांचे व्यक्तिमत्त्व व कारकीर्द विवादास्पद तशीच प्रभावशाली ठरली. आंतरराष्ट्रीय राजकारणात एक अत्यंत प्रभावशाली व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे नाव आदराने घेतले जात असे. त्यांच्या अंगी सचोटी, निर्भयता, असाधारण मनोधैर्य ही पिता जवाहरलाल यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये पुरेपूर होती. १९३० सालच्या कायदेभंग चळवळीच्या वेळी त्यांनी बारा ते सोळा वर्षांच्या वयोगटाची मुले जमवून त्यांची 'वानरसेना' उभी केली होती. त्या वानरसेनेने कायदेभंग चळवळीच्या काळात अलाहाबाद शहरात अनेक



इंदिरा गांधी

उपयुक्त कामे उत्साहाने केली. १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात 'फिरोज-इंदिरा' दांपत्याने सक्रिय सहभाग घेऊन तेरा महिन्यांचा कारावास भोगला होता. १९५९ साली त्यांची काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. काँग्रेस अध्यक्षपदी असतानाच्या त्या अल्पकाळातही संयुक्त महाराष्ट्राऐवजी गुजरात व महाराष्ट्र या दोन राज्यांची केलेली निर्मिती व केरळमधील साम्यवादी सरकारची, बरखास्ती या दोन घटनांनी त्यांच्या खंबीर व्यक्तिमत्त्वाचा सर्वांना प्रत्यय आला.

**१९६७ च्या सार्वत्रिक निवडणुका :** इंदिरा गांधींनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतरची दोन-अडीच वर्षे काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने गोंधळाची व निराशाजनक ठरली. पक्षात अंतर्गत दुफळी, गटबाजी, सत्तालोलुपता वाढू लागली होती. या गोष्टींना आवर घालणारे खंबीर नेतृत्व त्या वेळी पक्षात नव्हते. काँग्रेस पक्षात इंदिरा गांधींना कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागले. कारण काँग्रेसला मिळणाऱ्या जनतेच्या पाठिंब्यात बरीच घट झाली होती. या परिस्थितीचा अनिष्ट परिणाम १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी दिसून आला. त्या निवडणुकीत काँग्रेसला लोकसभेत ५२० पैकी २८४ जागा जिंकून आपले बहुमत राखता आले. परंतु १५ पैकी ८ राज्यांच्या विधानसभेत काँग्रेसला बहुमत गमवावे लागले. ती ८ राज्ये बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, पंजाब, पश्चिम बंगाल, ओरिसा, मद्रास आणि केरळ ही होती. उरलेल्या ७ राज्यांपैकी ३ राज्यांत काँग्रेसला निसटते बहुमत मिळाले होते. १९६७ च्या निवडणूक निकालाने काँग्रेसला मोठा धक्का दिला. या अपयशाची मीमांसा करताना पक्षातील परस्परविरोधी गट अपयशाचे खापर एकमेकांवर फोडू लागले. पक्षाच्या घसरणीला पंतप्रधान जबाबदार आहेत, असा प्रचार पक्षातील उजवा गट करू लागला. त्यांना पदावरून दूर करण्याची भाषाही बोलली जाऊ लागली.

**निवडणूक परिणाम**

**(अ) सिंडिकेटचे खच्चीकरण :** १९६७ च्या निवडणुकांनी काँग्रेस पक्षातील सत्ता समतोलात बदल घडवून आणला. सिंडिकेटच्या अनेक नेत्यांचा निवडणुकीत पराभव झाला. पक्षाध्यक्ष कामराज, पश्चिम बंगालचे अंतुल्य घोष आणि मुंबईचे

स. का. पाटील हे सिंडिकेटचे मातब्बर नेते पराभूत झाले. सिंडिकेटचे बहुतेक निष्ठावान अनुयायी लोकसभेत किंवा राज्यविधान सभेत निवडून आले नाहीत. त्यामुळे १९६७ च्या निवडणुकीनंतर शासननिर्मितीच्या प्रक्रियेवर सिंडिकेट गटाला आपले नियंत्रण ठेवता आले नाही.

**(ब) इंदिराजींचे स्थान बळकट :** १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला धक्के बसले असले तरी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे पक्षातील आणि शासनातील स्थान कमकुवत झाले नाही. पराभूत कामराज आणि सिंडिकेट यांची स्थिती इंदिराजींना आव्हान देण्यासारखी नसल्यामुळे इंदिराजींचे पक्षातील आणि सरकारमधील स्थान अधिक बळकट झाले. काँग्रेससाठी संपूर्ण देशभर प्रचार करणाऱ्या आणि पक्षाला मते मिळवून देणाऱ्या त्या एकमेव नेता (Star Campaigner) असल्याचे सिद्ध झाले.

संसदीय काँग्रेस पक्षाचे एकमुखी नेतृत्व आणि मंत्रिमंडळ बनविणे व खाते वाटप करणे यामधील स्वातंत्र्याने इंदिरा गांधींचे पक्षातील स्थान स्वतंत्र व भक्कम असल्याचे सिद्ध झाले.

**(क) राजकीय स्थैर्य :** १९६७ च्या निवडणुकीनंतर देशात राजकीय अस्थिरता येण्याची लक्षणे दिसत होती. लंडनच्या 'टाईम्स' या वृत्तपत्राने तर त्या निवडणुका भारतातील अखेरच्याच ठरणार असे भविष्य वर्तवले होते. अशा वेळी इंदिरा गांधींनी देशाला स्थैर्य दिले आणि देशाच्या राजकारणाची गाडी लोकशाहीच्या रुळावरून पक्केपणाने चालू ठेवली.

**काँग्रेसचा दहा कलमी कार्यक्रम**

१९६७ च्या निवडणुकांनंतर काँग्रेस पक्षात पराभवाची कारणमीमांसा करण्यात येऊ लागली. त्या वेळी पक्षापुढे दोन यक्ष प्रश्न असल्याचे जाणवले. (१) जनतेमधील वाढता असंतोष व त्याबरोबर येणार हिंसाचार याला कसे तोंड द्यावयाचे? (२) पक्षाची अधोगती थांबवून जनमत पुनः आपल्याकडे कसे वळवायचे? जनताभिमुख पुरोगामी धोरणे स्वीकारण्याची निकड पक्षातील डाव्या गटाने प्रतिपादन केली.

त्यानुसार काँग्रेस पक्षाच्या कार्यकारणीने मे, १९६७ मध्ये एक दहा कलमी कार्यक्रम आखला. त्यामध्ये बँकांवर सामाजिक नियंत्रण, विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण, ग्राहक सहकारी संस्थांची उभारणी, नागरी मालमत्तेवर कमालमर्यादा, शेती सुधारणा, औद्योगिक मक्तेदारीवर नियंत्रण घालणे, संस्थानिकांच्या तनख्यांची व खास हक्कांची समाप्ती इत्यादी मुद्दे अंतर्भूत केले होते.

परंतु पुढील दोन वर्षांत या कार्यक्रमांची अंमलबजावणी झालीच नाही. पक्षाची

अधिकृत धोरणे अमलात आणल्याखेरीज काँग्रेसची घसरलेली लोकमान्यता पुन्हा मिळवता येणार नाही; कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत पक्षातील परंपरावादी ज्येष्ठ नेत्यांचा मोठा अडसर असल्याचे इंदिरा गांधींना जाणवले. त्यामुळे त्या पक्षातील डाव्या गटाकडे झुकू लागल्या होत्या.

**इंदिराजी–सिंडिकेटमधील मतभेद**

१९६७ च्या निवडणुकीत सिंडिकेटच्या प्रमुख नेत्यांचा पराभव झाला होता. तथापि, कामराज व स. का. पाटील पोटनिवडणुकीत खासदार म्हणून निवडून आल्यावर सर्व सिंडिकेट सदस्यांनी 'पक्षाने धोरणे ठरवावीत व त्यांच्या अंमलबजावणीबाबत सरकारला जबाबदार धरले जावे' हे आपले मत आक्रमकपणे मांडायला सुरुवात केली होती. तसेच पक्षाच्या कारभारात पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी हस्तक्षेप करण्यास त्यांचा ठाम विरोध होता.

१९६७ सालाच्या अखेरीस कामराज पक्षप्रमुख पदावरून निवृत्त झाले. त्यांच्या जागी पुराणमतवादी निजलिंगाप्पा यांची निवड करण्यात आली. त्या वेळी इंदिराजींना आपल्याला अनुकूल पक्षाध्यक्ष निवडता आला नाही. पक्षाच्या कार्यकारणीवर आपल्या पसंतीचे सदस्य निवडून आणण्यात इंदिराजी अयशस्वी ठरल्या.

१९६८–६९ साली इंदिराजींना पंतप्रधान पदावरून खाली खेचण्याचे सिंडिकेट सदस्यांनी डावपेच रचून त्याप्रमाणे आपल्या हालचाली सुरू केल्या होत्या. सिंडिकेटच्या या भूमिकेला इंदिरा गांधींनी अत्यंत सावध व योग्य प्रत्युत्तर दिले. त्यांची भूमिका अशी होती की, सरकारचे धोरण ठरविण्याबाबत व देशाचा कारभार चालवण्याबाबत पंतप्रधान व त्याच्या मंत्रिमंडळासच अंतिम अधिकार असला पाहिजे. राज्य चालविण्याचे अधिकार सरकारला पक्षसंघटनेकडून मिळत नाहीत, तर ते जनतेने निवडून दिलेल्या लोक-प्रतिनिधींच्या सभेकडून मिळतात. आपल्या पदाला धोका निर्माण होत असल्याचे दिसताच इंदिराजींनी परिस्थितीचे आव्हान स्वीकारले व आपल्या विरोधकांवर कडाडून प्रतिहल्ला चढविला. त्याचप्रमाणे पक्षातील सर्व सत्ता आपल्या हाती घेण्याचा त्यांनी निर्धार केला.

१९६९ च्या एप्रिलमध्ये फरिदाबाद येथे झालेल्या पक्षाच्या अधिवेशनात पक्षाध्यक्ष निजलिंगाप्पा यांनी काँग्रेसच्या पुरोगामी धोरणावर टीका केली. सार्वजनिक क्षेत्रावर हल्ला चढवून त्यांनी खाजगी उद्योगाचे महत्त्व प्रतिपादन केले. त्याच अधिवेशनात इंदिरा गांधींनी पक्षाध्यक्षांनी मांडलेले मुद्दे खोडून काढून पक्षाच्या अधिकृत धोरणाचा पुरस्कार केला. समाजवादी समाजरचनेच्या ध्येयापासून काँग्रेसने विचलित होऊ नये, असे आवाहन इंदिराजींनी केले. ही दोन भाषणे म्हणजे पक्षातील उजव्या व डाव्या गटांतील भावी संघर्षाची चुणूक होती.

१९६७ ते १९६९ ही वर्षे काँग्रेसच्या इतिहासातील स्थित्यंतराची ठरली. १९६९ मध्ये भारताच्या राजकीय घडामोडीतील एक नवा टप्पा ठरणाऱ्या फुटीकडे काँग्रेसची वाटचाल सुरू झाली.

**राष्ट्रपती पदाची निवडणूक**

काँग्रेसमधील उजव्या व डाव्या विचारसरणीच्या दोन्ही गटांमधील वैचारिक दरी दिवसेंदिवस वाढत गेली. त्या दोन गटांतील संघर्षाला प्रत्यक्ष तोंड लागले ते राष्ट्रपती पदासाठी काँग्रेस उमेदवाराचे नाव निश्चित करण्याच्या मुद्द्यावरून. मे, १९६९ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांचा मृत्यू झाला आणि तेव्हापासून राष्ट्रपती पदासाठी पक्षाचा उमेदवार ठरवण्याच्या प्रश्नावरून काँग्रेस पक्षाची विभाजनाच्या दिशेने वेगाने वाटचाल सुरू झाली. राज्यघटनेतील तरतुदीनुसार राष्ट्रपती औपचारिकदृष्ट्या देशाचे प्रमुख असतात. परंतु संसदेत जर कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नसेल तर पंतप्रधानपदासाठी कोणाला पाचारण करावयाचे याचा स्वतः निर्णय घेऊन राष्ट्रपती महत्त्वाची राजकीय भूमिका बजावू शकतात. त्यामुळे काँग्रेसमधील सिंडिकेट गटाने राष्ट्रपती पदासाठी आपल्या माणसाला पक्षाचा उमेदवार बनवून निवडून आणण्याचा चंग बांधला. काँग्रेस संसदीय समितीमध्ये असलेल्या बहुमताच्या जोरावर ११ ते १३ जुलै, १९६९ रोजी बंगळूर येथे भरलेल्या काँग्रेस पक्षाच्या बैठकीत सिंडिकेटच्या नेत्यांनी आपल्या गटातील एक ज्येष्ठ नेते नीलम संजीव रेड्डी यांचे नाव राष्ट्रपती पदासाठी काँग्रेसचा उमेदवार म्हणून निश्चित केले. पंतप्रधान इंदिरा गांधींचा त्या नावाला पाठिंबा नव्हता.

नीलम संजीव रेड्डी राष्ट्रपती झाल्यावर त्यांच्यामार्फत आपली पंतप्रधान पदावरून हकालपट्टी करण्याचा सिंडिकेटचा डाव असल्याचे इंदिराजींच्या लक्षात आले. त्यांनी सर्वशक्तीनिशी पक्षातील आपल्या विरोधकांशी उघडपणे दोन हात करण्याचा ताबडतोब निर्णय घेतला. नीलम संजीव रेड्डी राष्ट्रपती झाल्यास पक्षाच्या पुरोगामी धोरणाच्या अंमलबजावणीस ते विरोध करतील अशी पंतप्रधानांना व पक्षातील डाव्या विचारसरणीच्या नेत्यांना भीती वाटत होती.

**संघर्षाचे हत्यार**

पक्षातील पुराणमतवादी विरोधकांशी संघर्ष करण्यासाठी पक्षाच्या सुधारणावादी ध्येय-धोरणाचा शस्त्र म्हणून वापर करण्याचे इंदिराजींनी ठरविले. काँग्रेसच्या बंगळूरच्या वादळी बैठकीनंतर लगेचच, १८ जुलै रोजी त्यांनी मोरारजींकडून अर्थखाते काढून स्वतःकडे घेतले. असे करताना मोरारजी देसाई सुधारणावादी आर्थिक कार्यक्रम राबविण्यास

असमर्थ आहेत, असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यामुळे मोरारजींनी मंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर २१ जुलैला राष्ट्रपतींच्या एका वटहुकमाने देशातील चौदा मोठ्या खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्याचे इंदिराजींनी जाहीर केले. त्याच सुमारास देशातील संस्थानिकांना देण्यात येत असलेले तनखे व विशेष सवलती रद्द करण्याचा आपला मनोदय त्यांनी जाहीर केला. त्या दोन्ही निर्णयांचे देशातील सामान्य जनतेने व डाव्या राजकीय पक्षांनी मन:पूर्वक स्वागत केले. इंदिराजींची सामान्य जनतेत लोकप्रियता वेगाने वाढू लागली.

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत नीलम संजीव रेड्डींच्या विरोधात ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ सी. डी. देशमुख हे जनसंघ व स्वतंत्र पक्षांच्या पाठिंब्यावर उभे होते. त्याशिवाय तत्कालीन उपराष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी हे अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यांना दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष, द्रमुक, मुस्लीम लीग व अकाली दलाच्या एका गटाचा पाठिंबा होता. अशा परिस्थितीत इंदिराजींनी विचारपूर्वक आपले पत्ते खेळायला सुरुवात केली. इंदिराजींची इच्छा व्ही. व्ही. गिरींना पाठिंबा देण्याची होती. परंतु पक्षाचे उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांच्या विरोधात कसे जावे हे त्यांना समजत नव्हते. नेमके या ठिकाणी सिंडिकेटने केलेली एक घोडचूक त्यांच्या पथ्यावर पडली. रेड्डी निवडून यावेत या उद्देशाने काँग्रेस अध्यक्ष निजलिंगाप्पा जनसंघ आणि स्वतंत्र पक्षाच्या नेत्यांना जाऊन भेटले व त्यांनी आपली दुसऱ्या पसंतीची मते रेड्डींना द्यावीत, अशी त्यांना विनंती केली. त्यामुळे इंदिराजींना आपली डावपेचांची खेळी करण्याची उत्तम संधी लाभली. इंदिरा गांधींनी आपली पंतप्रधान पदावरून हकालपट्टी करण्यासाठी सिंडिकेट जनसंघ व स्वतंत्र पक्षाशी गुप्तपणे हातमिळवणी करीत असल्याचा जाहीर आरोप केला. त्याचबरोबर त्यांनी काँग्रेस पक्षाच्या सर्व आमदार-खासदारांनी नीलम संजीव रेड्डींनाच मतदान करावे, असा आदेश काढायला नकार दिला व सर्व आमदार-खासदारांनी आपल्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून त्यांना योग्य वाटेल त्या उमेदवारास मतदान करावे, असे आवाहन केले. त्याचा अर्थ त्यांनी उघडपणे व्ही. व्ही. गिरींना पाठिंबा दिला. $\frac{1}{3}$ काँग्रेस आमदार-खासदारांनी पक्ष नेतृत्वाचे आदेश झुगारून गिरींना मतदान केले. २० ऑगस्ट रोजी व्ही. व्ही. गिरी राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत अल्पमताधिक्याने निवडून आले.

## काँग्रेसचे विभाजन

पक्षनिर्णय धाब्यावर बसवून इंदिरा गांधी व त्यांच्या पाठीराख्यांनी व्ही. व्ही. गिरी यांना राष्ट्रपती म्हणून निवडून आणले. त्यांच्या या पक्षविरोधी कारवायांबाबत सिंडिकेटने

इंदिरा गांधींवर १२ नोव्हेंबर रोजी शिस्तभंगाची कारवाई केली व त्यांना पक्षातून काढून टाकले. त्यामुळे काँग्रेस पक्षाचे विभाजन झाले. इंदिरा गांधींनी काँग्रेस-आर (रुलींग काँग्रेस, म्हणजेच सत्तारूढ काँग्रेस) नावाची स्वतंत्र संघटना स्थापन केली. सिंडिकेटच्या नियंत्रणाखाली असलेला काँग्रेस पक्ष, काँग्रेस-ओ (संघटना काँग्रेस) या नावाने ओळखला जाऊ लागला. काँग्रेसचे २२० खासदार इंदिराजींच्या बरोबर गेले व ६८ खासदारांनी सिंडिकेटला पाठिंबा दिला. अखिल भारतीय काँग्रेस महासमितीच्या ७०५ सभासदांपैकी ४४६ सभासदांनी इंदिरा गांधींना पाठिंबा दिला. इंदिराजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस-आर हा सौम्य डाव्या विचारसरणीचा पक्ष बनला. पुढे लवकरच काँग्रेस-आर हाच पक्ष खरा काँग्रेस पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला.

### १९७१ च्या मध्यावधी निवडणुका

सुधारणावादी कार्यक्रम आणि राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीतील नेत्रदीपक यश यामुळे इंदिरा गांधींना प्रचंड लोकप्रियता लाभली होती. शिवाय त्यांनी सिंडिकेटवरही मात केली होती. त्याचप्रमाणे त्यांनी देशातील नैराश्य दूर करून सर्वत्र नवचैतन्य आणले. तरीसुद्धा लोकसभेत निर्विवाद बहुमत नसल्यामुळे राजकीयदृष्ट्या त्यांचे स्थान तसे डळमळीतच होते. इंदिरा गांधींचे सरकार अल्पमतात असल्यामुळे सुधारणावादी कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक कायदे लोकसभेत मंजूर करून घेण्यात त्यांना वरचेवर अडचणी येऊ लागल्या. संस्थानिकांचे तनखे व इतर सवलती रद्द करण्याच्या निर्णयास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली. त्या सर्व अडचणीतून मार्ग काढण्यासाठी इंदिराजींनी २७ डिसेंबर, १९७० रोजी लोकसभा विसर्जित केली आणि फेब्रुवारी, १९७१ मध्ये म्हणजे मुदतीच्या एक वर्ष अगोदरच लोकसभेच्या निवडणुका घेण्याचे ठरविले.

लोकसभेच्या १९७१ मधील मध्यावधी निवडणुकीच्या वेळी संघटना काँग्रेस (काँग्रेस-ओ), जनसंघ, स्वतंत्र पक्ष व संयुक्त समाजवादी पक्ष या चार बिगर कम्युनिस्ट पक्षांनी 'बडी आघाडी' (Grand alliance) नावाची एक तात्पुरती आघाडी तयार केली. या आघाडीतील चार पक्षांमध्ये समान कार्यक्रमाचा व तात्त्विक साधर्म्याचा अभाव होता. वस्तुतः ती एक संधिसाधू आघाडी होती. 'इंदिरा-हटाव' हाच जणू त्यांचा एककलमी निवडणूक कार्यक्रम ठरला होता. प्रचार मोहिमेत आघाडीच्या नेत्यांनी इंदिरा गांधींच्यावर टीकेची झोड उठविली. इंदिराजींनी मात्र 'इंदिरा-हटाओ' या विरोधकांच्या घोषणेला 'गरिबी-हटाव' या घोषणेने प्रत्युत्तर दिले. रूढिप्रिय समाजात परिवर्तन घडवून आणण्याच्या आपल्या प्रयत्नांमध्ये खीळ घालणाऱ्यांचा पराभव करण्याचे त्यांनी मतदारांना

आवाहन केले. लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीत इंदिरा गांधींना प्रचंड विजय मिळाला. त्यांच्या काँग्रेस-आर पक्षाने लोकसभेच्या ५१८ जणांपैकी ३५२ जागी विजय मिळवून घटनादुरुस्तीसाठी संसदेत आवश्यक असलेले २/३ बहुमत मिळविले. बडी आघाडी व इतर उजव्या पक्षांचा दारुण पराभव झाला. १९७१ च्या या निवडणुकांनी काँग्रेस पक्षाला पुन: एकदा भारतीय राजकारणातील सर्वांत मोठा व शक्तिमान पक्ष बनविले. काँग्रेसला विजयी करून मतदारांनी एकाच वेळी परिवर्तन व स्थैर्य अशा दोन्ही बाजूंनी कौल दिला. महत्त्वाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांसाठी शोषितांना व गोरगरीब जनतेला एकत्र आणणे हा उत्तम राजकीय पर्याय ठरू शकतो, हे या निवडणुकांमध्ये इंदिराजींनी दाखवून दिले. आपल्याला हवे असलेले प्रचंड बहुमत मिळवून त्या बळावर इंदिराजी काँग्रेसमधील आणि भारतीय राजकारणातील सर्वशक्तिमान नेता बनल्या.

**बांगला देश मुक्तिसंग्राम (१९७१)**

भारतातील १९७१ च्या लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका पार पडल्यानंतर लगेचच पूर्व पाकिस्तानात लष्करी-राजकीय स्वरूपाचा एक गंभीर पेचप्रसंग उद्भवला. त्यात अपरिहार्यपणे भारत ओढला गेला आणि त्याचे पर्यवसान १९७१ च्या भारत-पाक युद्धात झाले.

पाकिस्तानच्या निर्मितीनंतर पंजाबी पश्चिम पाकिस्तान व बंगाली पूर्व पाकिस्तान यांना केवळ धर्माच्या आधारे एकत्र ठेवणे अशक्य झाले. पश्चिम पाकिस्तानमधील बड्या लोकांनी सैन्य, राजकारण, अर्थव्यवस्था व नोकरशाहीवर वर्चस्व मिळवून पूर्व पाकिस्तानची मुस्कटदाबी सुरू केली. त्यामुळे पूर्व पाकच्या नागरिकांनी पाकिस्तानमध्ये प्रबळ लोकशाहीवादी चळवळ सुरू केली. मात्र पाकिस्तानातील सत्ताधीशांनी ती चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला.

डिसेंबर, १९७० मध्ये पाकिस्तानचे लष्करी हुकूमशहा जनरल याह्याखान यांनी पाकिस्तानमध्ये निवडणुका घेतल्या. पूर्व पाकमधील शेख मुजीबुर रहमानच्या अवामी लीग पक्षाने पूर्व पाकिस्तानात ९९ टक्के जागा जिंकल्या आणि पाकच्या राष्ट्रीय संसदेत बहुमतसुद्धा मिळविले. परंतु जनरल याह्याखान व पाकिस्तानी लष्कर यांनी अवामी लीगला सरकार बनवू दिले नाही. त्याच्या निषेधार्थ अवामी लीगने नागरी कायदेभंगाची चळवळ सुरू केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून याह्याखानाने पूर्व पाकिस्तानात २५ मार्च, १९७१ रोजी अचानक लष्करी दडपशाही सुरू केली. शेख मुजीबुर रहमान यांना अटक करून पश्चिम पाकिस्तानामध्ये अज्ञातस्थळी नेण्यात आले. पाक लष्कराने सहा महिने पूर्व पाकमध्ये बलात्कार, छळ, लुटालूट, हत्या, जाळपोळ यांचे थैमान घातले. त्याचा

परिणाम म्हणून अवामी लीगचे नेते परागंदा होऊन कलकत्त्याला पोहोचले. तेथे त्यांनी बांगला देशाचे विद्रोही सरकार स्थापन करून मुक्तिसेनेची स्थापना केली. बांगला देशाचे विद्रोही सरकार व त्याची मुक्तिसेना योंना भारताकडून सर्व प्रकारची भरघोस मदत करण्यात आली. त्या मुक्तिसेनेने पूर्व पाकमध्ये छुपे हल्ले चढवून युद्ध सुरू केले.

युद्ध परिस्थितीमुळे पूर्व पाकमधून निर्वासितांचे लोंढे भारतात येऊन पश्चिम-बंगाल, आसाम व मेघालय या राज्यांत आश्रय घेऊन राहिले. नोव्हेंबर, १९७१ पर्यंत भारतात आलेल्या बांगला देशातील निर्वासितांची संख्या एक कोटीपर्यंत होती. त्याचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर व राजकीय स्थैर्यावर असह्य ताण पडला. बांगला देशाच्या प्रश्नावरून भारत-पाक युद्ध अटळ असल्याचे इंदिरा गांधींनी अचूक ओळखले. त्यांनी ही गंभीर परिस्थिती धैर्याने व अत्यंत सावधपणे हाताळली. संभाव्य युद्धाबाबत त्यांचे दोन उद्देश होते. (१) युद्ध झालेच तर ते भारताला हवे त्याच वेळेला सुरू व्हावे. (२) त्या युद्धापूर्वी भारताला अनुकूल जागतिक लोकमत तयार व्हावे. नोव्हेंबर, १९७१ अखेर भारताची युद्ध तयारी पूर्ण झाली होती. भारत संधीची वाट पाहात होता. **पाकिस्तानने स्वतः हे युद्ध सुरू केले. ते एकूण फक्त तेरा दिवस चालले. अखेर पूर्व पाकिस्तानची राजधानी ढाका येथे १६ डिसेंबर, १९७१ रोजी ९३,००० पाक सैनिकांनी शरणागती स्वीकारली.** १७ डिसेंबरला भारताने युद्धबंदी जाहीर केली.

**युद्धाचे भारताला फायदे**

(१) भारत दक्षिण आशियातील एक प्रबळ शक्ती असल्याचे सिद्ध झाले. (२) एक कोटी बांगलादेशी निर्वासितांना त्यांच्या मायदेशी परत पाठवून निर्वासितांचा प्रश्न सोडवला गेला. (३) १९६२ च्या युद्धातील भारताच्या पराभवाच्या कटूस्मृती पुसल्या गेल्या. भारताने गमावलेला आत्मविश्वास व आत्मसन्मान परत मिळविला. (४) भारताच्या धर्मनिरपेक्षतेची ताकद या निमित्ताने दिसून आली. (५) बांगला देशाचे युद्ध हा इंदिराजींचा एक मोठा विजय होता. या संकटकाळी त्यांच्या स्वभावातील खंबीरपणा व नेतृत्व गुणांचे जनतेला दर्शन झाले. त्यांची भारतातील लोकप्रियता प्रचंड प्रमाणात वाढली व त्या लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ झाल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांची प्रतिमा खूप उंचावली. भारतीय जनता त्यांना दुर्गेचा व स्त्रीशक्तीचा अवतार मानू लागली होती. 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने इंदिराजींना सन्मानित करण्यात आले.

**नेत्रदीपक यशाचा काळ**

१९७२ साल हे भारतीय स्वातंत्र्याचे रौप्य महोत्सवी वर्ष होते. देशात राजकीय स्थैर्य होते. निवडणुकीच्या वेळी जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यास अनुकूल

काळ होता. भारतीय जनतेच्या मनातील आत्मविश्वास दुणावला होता आणि राजकीय नेतृत्वावर जनतेचा पूर्ण विश्वास बसला होता. कार्यक्रमाची कार्यवाही सुरू करण्यापूर्वी राज्यांमध्येही सत्ता आपल्या हाती असली पाहिजे असा काँग्रेस नेतृत्वाचा निर्णय झाला आणि मार्च, १९७२ मध्ये उत्तर प्रदेश, ओरिसा, तमिळनाडू व केरळ सोडून अन्य राज्यांत विधानसभेच्या निवडणुका घेण्यात आल्या. त्या सर्व राज्यांत काँग्रेसला बहुमत मिळाले.

काँग्रेस पक्ष, केंद्रीय मंत्रिमंडळ, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री यांच्यावर इंदिरा गांधींची घट्ट पकड बसली होती. परंतु त्यामुळे त्यांच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण होऊन काँग्रेस पक्षाचे लोकशाही स्वरूप नाहीसे होऊ लागले. पक्ष आणि शासन या दोहोंत त्यांची एकाधिकारशाही सुरू झाली. परंतु १९७३ पासून इंदिरा गांधींचे नेतृत्व आणि काँग्रेस सरकार यांचा अर्थव्यवस्था, राजकारण आणि विश्वासार्हता या बाबतीत ऱ्हास सुरू झाला.

**आणीबाणी**

२५ व २६ जून, १९७५ च्या मध्यरात्री पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींनी अध्यादेशावर स्वाक्षरी केल्यानंतर देशात अंतर्गत आणीबाणी जाहीर करण्यात आली. त्याच्या परिणामांचा विचार करता देशाच्याच नव्हे तर खुद्द इंदिरा गांधींच्या दृष्टीने आणीबाणी लादणे ही एक मोठी चूक ठरली याबद्दल शंका नाही. परंतु त्यांनी असा निर्णय कोणत्या परिस्थितीत घेतला? आणीबाणीचे स्वरूप व परिणाम काय होते? या प्रश्नांची तटस्थपणे चर्चा करणे अगत्याचे आहे.

**कारणीभूत घटक**

**१. गुजरात विद्यार्थी आंदोलन :** १९७३ पासून अवर्षणामुळे व अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती भरमसाट वाढल्या होत्या. गुजरातमधील जनतेच्या मनात अन्नधान्याच्या तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या भडकत्या किमतीमुळे खदखदत असलेला असंतोष १९७४ सालच्या प्रारंभी शहरांमधून व गावांमधून विद्यार्थ्यांच्या व्यापक आंदोलनातून प्रकट झाला. गुजरातमधील विरोधी पक्षांनी त्या आंदोलनाला पाठिंबा दिला. विद्यार्थी आंदोलनामुळे गुजरातमध्ये काही काळ निर्नायकी अवस्था निर्माण झाली. राज्य विधानसभा बरखास्त करण्याच्या मागणीसाठी मोरारजी देसाई यांनी अहमदाबादला गुजरात विद्यापीठात उपोषण केले. फेब्रुवारी, १९७५ मध्ये गुजरात विधानसभा बरखास्त करून तेथे राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. गुजरात विधानसभेच्या निवडणुका जूनमध्ये घेण्याचे जाहीर करण्यात आले.

**२. बिहार विद्यार्थी आंदोलन व जयप्रकाश नारायण :** गुजरातपासून स्फूर्ती घेऊन मार्च, १९७४ मध्ये बिहारमधील विद्यार्थ्यांचे तीव्र आंदोलन सुरू झाले. आंदोलकांनी विधानसभा भवनला घेराव घातला. त्या वेळी आंदोलक आणि सुरक्षा दल यांच्यात झालेल्या संघर्षात सत्तावीस जणांना प्राण गमवावे लागले. बिहारमधील विरोधी पक्ष विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले. जयप्रकाश नारायण यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व हाती घेतले. वस्तुतः जयप्रकाश नारायण १९५० सालापासून सक्रिय राजकारणापासून दूर होते. या आंदोलनामुळे देशाच्या राजकारणात त्यांचे पुनरागमन झाले. संपूर्ण क्रांतीसाठी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध लढा पुकारण्याचे जयप्रकाश नारायण यांनी जनतेला आवाहन केले. परंतु 'संपूर्ण क्रांती, 'पक्षविरहित लोकशाही' या संकल्पना त्यांच्या मनात सुस्पष्ट नव्हत्या. त्याबाबतचा त्यांचा वैचारिक गोंधळ संपलेला नव्हता. बिहारमधील काँग्रेस सरकारने राजीनामा द्यावा आणि विधानसभा बरखास्त करून राज्यात नवीन निवडणुका घेण्याची जयप्रकाशजींनी मागणी केली. त्याचबरोबर त्यांनी जनतेला व विद्यार्थ्यांना सरकारला काम करणे अशक्य करून सोडण्याचे आवाहन केले. जनतेला आंदोलनाचा वेगवेगळ्या प्रकारचा कार्यक्रम देण्यात आला. परंतु बिहार विधानसभा बरखास्तीच्या मागणीला इंदिरा गांधींनी ठाम नकार दिला.

जयप्रकाश नारायण यांनी इंदिरा गांधी व त्यांची सरकारे याविरुद्ध देशव्यापी आंदोलन छेडण्याची घोषणा केली. इंदिरा गांधींकडे 'भ्रष्टाचाराचे उगमस्थान असणारी व देशातील लोकशाहीला धोका निर्माण करणारी व्यक्ती' अशा नजरेने सर्वत्र पाहिले जाऊ लागले होते. आंदोलनाचा प्रसार करण्यासाठी जयप्रकाशजींनी देशव्यापी दौरा हाती घेतला. विरोधी पक्षांनी त्यांच्या प्रचार दौऱ्याला पाठिंबा दिला. उत्तरेत जनसंघ व संयुक्त समाजवादी पक्ष यांच्या प्रभावक्षेत्रात जयप्रकाशजींना मोठा पाठिंबा मिळाला. मात्र १९७४ च्या अखेरीस विद्यार्थी आंदोलन ओसरत गेले.

**३. अलाहाबाद हायकोर्टाचा निर्णय :** गुजरात व बिहारमधील विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधींची १९७१ मधील रायबरेली मतदार संघातून लोकसभेवर झालेली निवड रद्द करण्याचा निर्णय १२ जून, १९७५ रोजी अलाहाबाद हायकोर्टाचे न्यायमूर्ती जगमोहन सिन्हा यांनी जाहीर केला. त्याबरोबरच न्यायालयाने इंदिरा गांधींना सहा वर्षे निवडणुकीसाठी अपात्र ठरविले. रायबरेली मतदारसंघातील एक पराभूत उमेदवार श्री. राजनारायण यांनी अलाहाबाद हायकोर्टात याचिका दाखल करून इंदिरा गांधींच्या १९७१ मधील लोकसभेवरील निवडीला आव्हान दिले होते. त्या याचिकेत त्यांनी

इंदिरा गांधींनी निवडणूक जिंकण्यासाठी पदाचा दुरुपयोग व अवैध मार्गाचा अवलंब केल्याचा आरोप केला होता. अलाहाबाद हायकोर्टाने राजनारायण यांचा दावा मान्य करून आपला निर्णय जाहीर केला. मात्र १४ जून रोजी सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिली. परतु १३ जून, १९७५ रोजी गुजरात विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन काँग्रेस पक्ष गुजरातमध्ये पराभूत झाल्याचे स्पष्ट झाले.

अलाहाबाद हायकोर्टाचा निकाल व गुजरात विधानसभा निवडणूक निकाल यामुळे जयप्रकाशजींच्या आंदोलनात नवचैतन्य आले. इंदिराजींना पदाचा राजीनामा देण्यास भाग पाडावे या उद्देशाने देशव्यापी आंदोलनाची जयप्रकाशजींनी घोषणा केली. २५ जून, १९७५ रोजी दिल्लीत त्यांची विराट सभा झाली. त्या सभेत विरोधी पक्षांनी व जयप्रकाशजींनी जाहीर केले की, २९ जूनपासून पंतप्रधानांच्या राजीनाम्यासाठी आठवडाभराचे देशव्यापी आंदोलन व कायदेभंग चळवळ करण्यात येणार आहे. या आंदोलनाची सांगता पंतप्रधानाच्या निवासस्थानास हजारो स्वयंसेवकांच्या घेरावाने होणार होती.

**आणीबाणीची घोषणा :** जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनामुळे देशात विशेषत: उत्तरेकडील राज्यात अराजक वाढले आणि त्याला आळा घालण्यासाठी काँग्रेस सरकारने देशात आणीबाणी जाहीर केली. २६ जून, १९७५ रोजी राज्यघटनेच्या ३५२ व्या कलमानुसार देशात अंतर्गत आणीबाणी जाहीर करण्यात आली. त्याच वेळी योग्य परिस्थिती निर्माण होताच आणीबाणी उठविण्याचे आश्वासनही देण्यात आले होते.

अंतर्गत आणीबाणी जाहीर झाल्यानंतर देशातील सर्वमान्य राजकीय प्रक्रिया थांबविल्या गेल्या. घटक राज्यांशी संबंधित तरतुदी, मूलभूत हक्क व व्यक्तिस्वातंत्र्याशी संबंधित तरतुदींवर निर्बंध घालण्यात आले. सरकारने वृत्तपत्रांतील बातम्यांवर कडक निर्बंध घातले. विरोधी पक्षांचे प्रमुख नेते, राजकीय कार्यकर्ते, गुंड, तस्कर, साठेबाज, समाजकंटक अशा सुमारे एक लाखाच्या आसपास लोकांना अटक करून कारावासात टाकले.

**वीस कलमी कार्यक्रम :** अंतर्गत आणीबाणीच्या काळात देशातील गरीब जनतेच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी १ जुलै, १९७५ रोजी इंदिरा गांधींनी वीस कलमी कार्यक्रम जाहीर केला. त्या कार्यक्रमात पुढील महत्त्वाच्या आश्वासनांचा समावेश होता : (१) वेठबिगारी नष्ट करणे. (२) भूमिहीन शेतमजूर, लहान शेतकरी इ. दुर्बल

VIVEKA... LIBRARY Accn.No. 54094 Date.......... KOLHAPUR

घटकांची खाजगी कर्जे माफ करून त्यांना वेगळी सुलभ कर्जे उपलब्ध करून देणे. (३) अस्तित्वात असलेल्या कमाल जमीनधारणा कायद्याची अंमलबजावणी करून अतिरिक्त जमिनीचे भूमिहीनांना वाटप करणे. (४) भूमिहीन शेतमजूर व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांना घरे बांधण्यासाठी जमीन उपलब्ध करून देणे. (५) शेतमजुरांचे किमान वेतन वाढविणे. (६) जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी करणे. (७) हातमाग व्यवसायाला उत्तेजन, विशेष मदत देणे. (८) जीवनावश्यक वस्तूंचे वितरण चांगल्या प्रकारे करणे. (९) उत्पादन वाढविणे. (१०) करचुकवेगिरी व चोरट्या आयातीला पायबंद घालणे.

सुरुवातीच्या वर्षभरात पंतप्रधानांच्या २० कलमी कार्यक्रमाची कसोशीने अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे वस्तूंच्या वाढत्या किमतीला आळा बसला. जीवनावश्यक वस्तूंचा भरपूर पुरवठा होऊ लागला. साठेबाजी, करचुकवेगिरी यांना आळा बसला. काही काळ महागाई कमी झाली. वीस कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणी काळात भूमिहीनांना व दलितांना घरे बांधण्यासाठी एकूण तीस लाख भूखंड उपलब्ध करून देण्यात आले. त्याचप्रमाणे अकरा लाख एकर अतिरिक्त जमिनीचे भूमिहीनांना वाटप करण्यात आले. त्यामुळे आणीबाणी काहीशी सुसह्य झाली. परंतु वीस कलमी कार्यक्रमामुळे गरीब जनतेच्या मूळ परिस्थितीत फारसा बदल झाला नाही.

त्या काळात इंदिरा गांधींचे कनिष्ठ पुत्र संजय गांधी यांचे एक संपूर्ण घटनाबाह्य सत्ताकेंद्र निर्माण झाले होते. या अनधिकृत सत्ताकेंद्रामुळे आणीबाणीची प्रारंभीची लोकप्रियता वेगाने घटत गेली. संजय गांधींचे घटनाबाह्य सत्तास्थान व त्यांचा राज्यकारभारातील वाढता हस्तक्षेप या गोष्टी आणीबाणीविषयी जनतेच्या मनात कटुता निर्माण होण्याचे महत्त्वाचे कारण ठरले. संजय गांधींनी जुलै, १९७६ मध्ये आपला स्वत:चा एक वेगळा चार कलमी कार्यक्रम जाहीर केला. त्यांचे चार मुद्दे असे होते : (१) झाडे लावा. (२) साक्षरता प्रसार करा. (३) लग्नाच्या वेळी हुंडा घेऊ नका. (४) कुटुंबनियोजन करून अपत्यांची संख्या दोनवरच मर्यादित ठेवा. वस्तुत: त्यांचा हा चार कलमी कार्यक्रम विधायक स्वरूपाचा होता. परंतु त्याची अंमलबजावणी निष्ठुरपणे, निर्दयपणे करण्याचा प्रयत्न झाल्यामुळे जनतेच्या मनात प्रचंड असंतोष निर्माण झाला.

आणीबाणीच्या काळात नोकरशाहीच्या हाती सत्ता एकवटली. नोकरशाहीने सत्तेचा दुरुपयोग करून जनतेवर अनेक गोष्टींची सक्ती केली व अनन्वित जुलूम केला. त्यामुळे अल्पावधीत आणीबाणीबद्दल जनतेचा भ्रमनिरास झाला. नोकरशाहीच्या बेमुर्वतखोर वागण्याचे दुष्परिणाम राज्यकर्त्यांना भोगावे लागले.

(झाडे, साक्षरता, हुंडा नको, कुटुंब नियोजन)

## निवडणुकीची अनपेक्षित घोषणा

जानेवारी, १९७७ मध्ये इंदिरा गांधींनी मार्चमध्ये लोकसभा निवडणुका घेण्याची अनपेक्षित घोषणा केली. त्याच वेळी राजकीय नेत्यांची कारावासातून मुक्तता केली. राजकीय पक्षांवरील बंधने, वृत्तपत्रांवरील आणि जाहीर प्रचार सभांवरील निर्बंध काढून टाकले. मार्च, १९७७ मध्ये झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला. स्वत: इंदिरा गांधी व संजय गांधी पराभूत झाले. त्यांनी जनमताचा कौल स्वीकारला. मंत्रिमंडळाच्या शेवटच्या बैठकीत इंदिरा गांधींनी देशातील अंतर्गत आणीबाणी रद्द करण्याची उपराष्ट्रपतींना शिफारस करण्याचा निर्णय घेतला आणि सत्तासूत्रे खाली ठेवली. अशा प्रकारे निवडणुकीद्वारे भारतात शांततापूर्ण सत्तांतर घडून आले. भारतीय लोकशाहीचा हा विजय होता.

## काँग्रेस–आय (इंदिरा काँग्रेस) पक्षाचा उदय

१९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत झालेल्या पराभवाची मीमांसा करताना काँग्रेसमधील काही ज्येष्ठ नेत्यांनी त्याचे खापर इंदिरा गांधी व त्यांचे पुत्र संजय गांधींवर फोडले. इंदिरा गांधी आता निष्प्रभ झालेल्या आहेत व राजकीयदृष्ट्या गैरसोईच्या झाल्या आहेत असे काँग्रेसमधील प्रस्थापित नेत्यांना वाटत होते. अशा नेत्यांचे प्रमुख यशवंतराव चव्हाण आणि के. ब्रह्मानंद रेड्डी हे होते. निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षात तीव्र मतभेद निर्माण झाले आणि त्याचा परिणाम म्हणून जानेवारी, १९७८ मध्ये काँग्रेस पक्ष पुन्हा दुभंगला. या वेळी स्वर्णसिंग, यशवंतराव चव्हाण इत्यादी प्रस्थापित नेत्यांनी पक्षाध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी यांना साथ दिली. तर तरुण कार्यकर्त्यांचा गट इंदिरा गांधींच्या पाठीशी राहिला. या वेळी झालेल्या पक्ष विभाजनानंतर रेड्डींच्या अध्यक्षतेखालील काँग्रेसला काँग्रेस–आर तर इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील गटाला काँग्रेस–आय असे संबोधिले जाऊ लागले.

पुढील काळात इंदिरा गांधी व त्यांचा काँग्रेस–आय पक्ष यांचे भविष्य उज्ज्वल व्हायला लागले. फेब्रुवारी, १९७८ मध्ये राज्यविधिमंडळाच्या निवडणुकांत काँग्रेस-आय ने कर्नाटक व आंध्रमध्ये जनता पक्ष व रेड्डी काँग्रेस यांचा पराभव करून सत्ता काबीज केली. काँग्रेस पक्षाच्या पुनरुज्जीवनाची दोन प्रमुख कारणे होती. त्यापैकी एक कारण होते जनता सरकारचे सुडाचे धोरण. इंदिरा गांधींचा न्यायनिवाडा करण्याऐवजी त्यांच्यावर सूड उगविण्याच्या दृष्टीने जनता सरकार त्यांच्यामागे चौकशी समित्यांचा ससेमिरा लावत आहे; असा सामान्य जनतेचा ग्रह होऊ लागला. दुसरे कारण असे की, ग्रामीण व शहरी भागात हरिजन, अल्पसंख्यांक, महिला व समाजातील गरीब, दुर्बल घटकांच्या मनात इंदिराजींबद्दल प्रगाढ भक्ती होती. लोकांच्या दृष्टीने इंदिराजींची

काँग्रेस हीच खरी काँग्रेस होती. म्हणून लोक मोठ्या संख्येने परत काँग्रेस पक्षाकडे व इंदिराजींकडे वळले.

१९७८ च्या नोव्हेंबरमध्ये कर्नाटकातील चिकमंगळूर लोकसभा मतदार संघात झालेल्या पोटनिवडणुकीत इंदिराजींना प्रचंड विजय मिळाला व त्या लोकसभेत निवडून आल्या. परंतु जनता सरकारने १९ डिसेंबर, १९७८ रोजी बहुमताच्या जोरावर इंदिराजीं विरुद्ध विशेष अधिकाराचा भंग केल्याबद्दल ठराव मांडून लोकसभेतील त्यांचे सभासदत्व रद्द केले.

**इंदिरा गांधींचे पुनरागमन**

सत्ताप्राप्तीनंतर दोन वर्षांच्या आत सत्तारूढ जनता पक्षात फाटाफूट झाली. १९७९ च्या मध्यावर जनता सरकारमधील अंतर्गत कलह पराकोटीला पोहोचले. त्या वेळी इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाने आक्रमक व आंदोलनात्मक भूमिका स्वीकारून जनता पक्षाने केलेल्या अनेक चुकांचा लाभ घेत काँग्रेस-आय पक्षाला बळकटी आणली. केंद्रातील जनता पक्षाचे सरकार अस्थिर होऊन अल्पमतात गेल्यामुळे जानेवारी, १९८० मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीत काँग्रेस-आय, काँग्रेस-आर, लोकदल व जनता पक्ष यांच्यात प्रमुख चुरस होती. जनता सरकार आपापसातील भांडणामुळे कोसळले होते. त्यामुळे लोकांचा जनता पक्षाबद्दल भ्रमनिरास झाला होता. या निवडणुकीत इंदिरा गांधींनी 'जे सरकार काम करते, त्या सरकारला मत द्या.' अशी घोषणा केली. काँग्रेस-आयला जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळाला. लोकसभेच्या ५२९ जागांपैकी ३५३ जागा जिंकून इंदिराजींनी लोकसभेत बहुमत मिळविले. ३४ महिन्यांनंतर इंदिरा गांधी पुन्हा सत्तारूढ झाल्या.

इंदिरा गांधी देशाच्या पुन्हा पंतप्रधान झाल्या तरी त्या पूर्वीच्या कणखर पंतप्रधान राहिल्या नव्हत्या. राजकारण आणि राज्यकारभार यावरील त्यांची पकड शिथिल झाली होती. त्यांच्या सत्तेला आव्हान देणारे कोणी विरोधक नसतानासुद्धा महत्त्वाची धोरणे ठरवताना व गुंतागुंतीच्या समस्या सोडविताना त्या दोलायमान होऊ लागल्या होत्या. त्यांच्या निर्णयात पूर्वीसारखा दृढ निर्धार आढळून येत नव्हता. इंदिराजी आता पूर्वीच्या राहिल्या नाहीत हे हळूहळू जनतेच्या लक्षात येऊ लागले.

इंदिरा गांधींची पंतप्रधान पदाची दुसरी कारकीर्द फारशी यशस्वी झाल्याचे दिसत नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे काँग्रेस पक्ष दुबळा झालेला होता. पक्ष संघटना खिळखिळी झाली होती. काँग्रेस पक्षाला पूर्वीचे सामर्थ्य मिळवून देण्यास इंदिराजी असमर्थ होत्या. त्याचा परिणाम सरकारचे कामकाज व त्याची लोकप्रियता यांच्यावर होऊ लागला. जनता व सरकार यांच्यातील पक्ष हा महत्त्वाचा दुवा कमकुवत झाल्यामुळे

सरकार व जनता यांच्यातील दरी वाढत गेली. जानेवारी, १९८३ मध्ये आंध्र प्रदेश व कर्नाटक राज्यांच्या विधिमंडळ निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव झाला.

इंदिरा गांधींना पंतप्रधान पदाच्या आपल्या दुसऱ्या कारकिर्दीत काश्मीर, पंजाब आणि आसाम यांच्याशी निगडित तीन गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागले. तसेच अनेक धार्मिक, राजकीय, भाषिक आणि जातीय समस्यांना तोंड देताना त्यांची दमछाक झाली. १९८० ते १९८४ या काळात देशात धार्मिक दंग्यांचे प्रमाण खूप वाढले होते. त्याचे लोण दक्षिण भारतातही पसरले होते. ही परिस्थिती हाताळताना इंदिराजींना बरेच ताणतणाव सोसावे लागले.

परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात मात्र इंदिरा गांधी सरकार बरेचसे यशस्वी ठरले. मार्च, १९८३ मध्ये अलिप्त राष्ट्रगटाच्या सातव्या शिखर परिषदेचे भारताने आयोजन केले होते. या अधिवेशनाचे अध्यक्षपद आणि अलिप्त देशांच्या चळवळीचे नेतृत्व इंदिराजींकडे आपोआप आले. अलिप्ततावादी राष्ट्रांच्या नेता या नात्याने एक नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था तयार व्हावी यासाठी त्या प्रयत्नशील होत्या. त्यामुळे विकसनशील देशांना योग्य न्याय मिळणे शक्य होणार होते.

पंजाबमधील अतिरेक्यांना पाकिस्तानची मदत आहे याची जाणीव असूनही इंदिरा गांधींनी चीन व पाकिस्तान या दोन शेजारी देशांबरोबरचे संबंध सुधारण्याचे प्रयत्न केले. एप्रिल, १९८४ मध्ये काश्मीरमधील सियाचीन भागात नियंत्रण रेषेनजीक लष्कराची एक ब्रिगेड पाठविण्याचा आदेश देऊन इंदिराजींनी आपल्या कणखर वृत्तीची प्रचिती आणून दिली.

**इंदिराजींची हत्या**

पंजाबमध्ये शिखांचा दहशतवाद झपाट्याने वाढत होता. खलिस्तानच्या निर्मितीची चळवळ फोफावत चालली होती. अकाली नेत्यांशी वाटाघाटी करण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न इंदिरा गांधी करत होत्या. परंतु अकालींच्या आनंदपूरसाहिब ठरावाला संमती देणे किंवा भारतातून फुटून निघून स्वतंत्र **'खलिस्तान' च्या निर्मितीला मान्यता देणे** त्यांना अशक्य नव्हते. १९८३ साली पंजाबचे राजकारण निकरावर आले. शांततापूर्ण वाटाघाटीच्या मार्गाने पंजाब प्रश्नाची उकल करण्याचे इंदिरा गांधींचे सर्व प्रयत्न विफल ठरले होते. पंजाबमधील दहशतवादी कारवायांच्यामुळे राष्ट्रीय ऐक्याला धोका निर्माण झाला होता. अशा परिस्थितीत सुवर्ण मंदिरातून दहशतवाद्यांचे उच्चाटन करण्यासाठी लष्करी कारवाई करण्याव्यतिरिक्त अन्य पर्याय त्यांच्यापुढे नव्हता. त्यामुळे सुवर्ण मंदिरात व अन्य गुरुद्वारात लपून बसलेल्या दहशतवाद्यांना बाहेर काढण्यासाठी केंद्रशासनाने लष्करी कारवाई ३ जून, १९८४ ला 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार' हे सांकेतिक नाव असलेली

सुरू केली. ६ जून, १९८४ ला ती कारवाई पूर्ण झाली. त्यात भिंद्रनवाले व त्याचे बरेच अनुयायी मारले गेले. पवित्र सुवर्णमंदिर परिसरातील लष्करी कारवाईमुळे देशभरातील शिखांमध्ये संताप व अपमानाची भावना निर्माण झाली. ऑपरेशन ब्ल्यू स्टार कारवाई झाल्यानंतर सुवर्णमंदिराच्या पावित्र्याचा भंग केल्याबद्दल इंदिरा गांधी आणि त्यांच्या कुटुंबीयांवर सूड उगविण्याची दहशतवाद्यांनी शपथ घेतली.

३१ ऑक्टोबर, १९८४ रोजी इंदिराजींच्या सुरक्षा रक्षकांपैकी शीख दहशतवाद्यांच्या संपर्कात आलेल्या सबइन्स्पेक्टर बियंतसिंग व कॉन्स्टेबल सतवंत सिंग या दोघा शीख सुरक्षा रक्षकांनी त्यांची गोळ्या घालून हत्या केली आणि त्याबरोबरच त्यांची पंतप्रधान पदाची कारकीर्द संपुष्टात आली.

**इंदिरा गांधी : मूल्यमापन**

इंदिरा गांधींचे टीकाकार त्यांच्यावर तीन-चार मुद्द्यांना धरून टीका करत. ते मुद्दे – (१) अलाहाबाद हायकोर्टाचा निर्णय त्यांच्याविरुद्ध लागूनसुद्धा त्यांनी पदाचा राजीनामा दिला नाही. (२) त्या हुकूमशाही वृत्तीच्या असल्यामुळे त्यांनी पक्षांतर्गत निवडणुका घेतल्या नाहीत. (३) देशावर आणीबाणी लादून त्यांनी लोकशाहीचा गळा घोटला. (४) संजय गांधींना राजकारणात पुढे आणून नेहरू कुटुंबाची घराणेशाही टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला. या आक्षेपांची नोंद घेण्याबरोबरच इंदिरा गांधींनी देशाच्या केलेल्या सेवेचे यथार्थ मूल्यमापन होणे आवश्यक आहे.

भारत एक आधुनिक, स्वावलंबी, समर्थ राष्ट्र बनावे ही त्यांची महत्त्वाकांक्षा होती. भारताने त्यांच्या कारकिर्दीत कृषी, औद्योगिक व वैज्ञानिक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली.

आपल्या देशावर दुष्काळाचे संकट पुन्हा येऊ नये यासाठी त्यांनी कृषी उत्पादनवाढीवर भर दिला व त्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न केले. निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करून त्यांनी देशात 'हरित क्रांती' घडवून आणली. त्यांच्या कारकिर्दीच्या अखेरीस देशातील अन्नधान्याचे उत्पादन १५१.७ दशलक्ष टनापर्यंत वाढले होते. अन्नधान्याच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण झाला होता.

देशाच्या औद्योगिक विकासाचा वेग वाढविण्याला त्यांनी प्राधान्य दिले. औद्योगिक क्षेत्रात झालेल्या भारताच्या प्रगतीसाठी इंदिराजींनी आधुनिकीकरणाला व नियोजन प्रक्रियेला दिलेली चालना महत्त्वाची ठरली. १९७९ साली आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खनिज किमतीत एकदम तिपटीने वाढ झाल्यामुळे देशाच्या ऊर्जा विकासावर त्यांनी विशेष भर दिला. १९८० साली सत्तेत आल्यानंतर त्यांनी सहाव्या पंचवार्षिक योजनेची पुनर्रचना केली. भांडवल गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊन देशाच्या अर्थव्यवस्थेतील काही

बंधने शिथिल केली. सहाव्या योजनेत औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा दर ६.९ टक्के होता.

इंदिरा गांधींच्या काळातील आणखी एक लक्षणीय यश म्हणजे देशातील खनिज तेलाच्या उत्पादनाला मिळालेली गती. मुंबईपासून थोड्या अंतरावर सागरात मोबाईल ड्रिलींग प्लॅटफॉर्म उभारून केलेल्या तेल शोधनाच्या पाचही विहिरीत खनिज तेलाचे विपुल साठे सापडले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या किमती सतत वाढत असताना भारताला हे यश लाभले, हे विशेष महत्त्वाचे आहे.

भारताने इंदिराजींच्या कार्यकाळात विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती साधली. विज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात विशेषतः अणुशक्ती व अवकाश तंत्रज्ञानात भारताने आज जगात मानाचे स्थान मिळविले आहे. त्यात भारतीय वैज्ञानिकांना त्यांनी दिलेली मदत व प्रोत्साहन या बाबी महत्त्वाच्या आहेत. १९६९ साली त्यांनी 'इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन' (ISRO) ची स्थापना केली. राजस्थानातील पोखरण येथे १९७४ मध्ये भूगर्भात केलेली पहिली यशस्वी अणुचाचणी, पूर्णपणे भारतीय बनावटीची तयार झालेली उपग्रह यंत्रणा, १९७५ मध्ये पूर्णपणे भारतीय तंत्रज्ञानाने बनलेला अवकाशात झेप घेणारा उपग्रह 'आर्यभट्ट', त्यानंतर अवकाशात सोडलेला 'रोहिणी' हा उपग्रह, १९८१ मध्ये भारताने अवकाशात स्थिर केलेला 'अॅपल' हा दळणवळण उपग्रह इ. गोष्टी विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रात भारताला स्वावलंबी बनविण्याच्या इंदिरा गांधींच्या तळमळीची साक्ष देतात.

इंदिरा गांधींनी देशातील सागरी संशोधनाला चांगली चालना दिली. त्या क्षेत्रातही भारताने अल्पावधीत उल्लेखनीय प्रगती केली.

विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात भारताने इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत मारलेली मजल पाहून एका आघाडीच्या अमेरिकन साप्ताहिकाने त्यांचे वर्णन 'द क्वींन ऑफ इंडियन सायन्सेस' असे केले होते.

उच्च दर्जाचे वैज्ञानिक व तंत्रज्ञ यांच्या देशातील संख्येवरून जगात भारत तिसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र बनला. तसेच लष्करी सामर्थ्यात पाचव्या क्रमांकाचे, अणुशक्तीचे तंत्रज्ञान अवगत असलेल्या राष्ट्रांत सहाव्या क्रमांकाचे, अवकाशात प्रवेश करणारे राष्ट्र म्हणून सातव्या क्रमांकाचे, तर औद्योगिक सत्ता म्हणून दहाव्या क्रमांकाचे राष्ट्र म्हणून भारताला इंदिराजींच्या कार्यकालात मान्यता मिळाली. देशाच्या सर्वांगीण प्रगतीत इंदिरा गांधींनी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. काँग्रेस पक्षांतर्गत सिंडिकेट गटात ....... यांचा समावेश नव्हता.

*(अ) के. कामराज* *(ब) स. का. पाटील*

*(क) नीलम संजीव रेड्डी* *(ड) के. ब्रह्मानंद रेड्डी*

२. १९६९ च्या राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीच्या वेळी ..... काँग्रेस अध्यक्ष होते.

*(अ) जगजीवनराम* *(ब) के. कामराज*

*(क) निजलिंगाप्पा* *(ड) देवकांत बरुआ*

३. अवामी लीगच्या परागंदा नेत्यांनी ....... येथे आपले विद्रोही सरकार स्थापन केले.

*(अ) ढाक्का (ब) कलकत्ता (क) कराची (ड) दिल्ली*

४. १९७१ च्या मध्यावधी निवडणुकीसाठी तयार झालेल्या बड्या आघाडीत ..... चा समावेश नव्हता.

(अ) जनसंघ (ब) भारतीय साम्यवादी पक्ष

(क) स्वतंत्र पक्ष (ड) संघटना काँग्रेस

५. १९७७ च्या निवडणुकीत ....... मतदार संघातून इंदिरा गांधी पराभूत झाल्या.

*(अ) अमेठी (ब) अलाहाबाद (क) चिकमंगरूळ (ड) रायबरेली*

**प्रश्न २. टीपा लिहा.**

(अ) सिंडिकेट (ब) १९६९ ची राष्ट्रपती निवडणूक

(क) जयप्रकाश नारायण (ड) बांगला देश मुक्तिसंग्राम

(इ) वीस कलमी कार्यक्रम (ई) ऑपरेशन ब्ल्यू स्टार.

**प्रश्न ३. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. १९६९ मधील काँग्रेस पक्षातील फुटीची कारणे व परिणाम यांची चर्चा करा.

२. १९७५ साली देशात अंतर्गत आणीबाणी लागू होण्यास कोणती परिस्थिति कारणीभूत झाली ते सांगून आणीबाणीचे परिणाम विशद करा.

३. इंदिरा गांधींच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

❖❖❖